





# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

* वर्ष ६५ वे * अंक १५१ * नांदेड * रविवार, दि. ७ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211







# केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिल्लीत 'कॉक्रोच जनता पार्टी'चे आंदोलन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** विविध शैक्षणिक आणि भरती परीक्षांमधील गैरव्यवहार आणि पेपर फुटी मुद्द्यावरून देशातील तरुण वर्ग आक्रमक झाला आहे. 'कॉक्रोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजित दिपके शनिवारी सकाळी भारतात परतले असून, त्यांनी दिल्लीतील जंतर-मंतर येथे या भव्य आंदोलनाचे नेतृत्व केले. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत हजारो विद्यार्थी आणि तरूणांनी या आंदोलनात सहभाग घेतला. या आंदोलनादरम्यान जंतर-मंतर परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली होती.



आंदोलनाला संबोधित करताना अभिजित दिपके म्हणाले, आपला हा लढा मोठा आहे. आम्ही गेल्या एका महिन्यापासून सोशल मीडियावर शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहोत. मात्र, कारवाई करण्याऐवजी आमचे सोशल मीडिया अकाउंट्स हॅक करणे आणि पोस्ट डिलीट करण्याचे काम केले जात आहे. तुम्ही आमच्या पोस्ट डिलीट करू शकता, पण आम्हाला इथून हटवू शकत नाही. या आंदोलनादरम्यान दिपके यांच्या हातात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आत्मचरित्र पाहायला मिळाले.

या आंदोलनात केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा, योग्य प्रशिक्षणाशिवाय घाईघाईने डिजिटल शिक्षण नको, मणिपूरमधील शिक्षण व्यवस्था पूर्ववत करा, स्पर्धा परीक्षांमध्ये पारदर्शकता आणि विश्वासार्हता, विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची जबाबदारी आणि उत्तरदायित्व घेणे या पाच प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

या आंदोलनात शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी, पालक आणि तरुण व्यावसायिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अनेक आंदोलकांनी चेहऱ्यावर कॉक्रोचचे (झुरळाचे) मास्क लावले होते आणि हातात फुले घेतली होती.

आंदोलनस्थळी तरुणांनी धर्मेंद्र प्रधान, राजीनामा द्या! अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. तसेच आंदोलनात जय भीमच्या घोषणाही देण्यात आल्या. सोशल मीडियावरून सुरू झालेली ही चळवळ आता थेट रस्त्यावर उतरल्याने केंद्र सरकारवरील दबाव वाढण्याची शक्यता आहे.

# मान्सून महाराष्ट्रात दाखल, तळकोकणात ६ जूनलाच धडक

## राज्यात दोन-तीन दिवसांत पावसाची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात एकीकडे मान्सूनचे वारे वाहू लागले आहेत. महाराष्ट्राच्या वेशीवर नैऋत्य मोसमी वारे हजर झाले आहेत. दोन ते तीन दिवसात महाराष्ट्रात पाऊस येण्याची शक्यता वर्तवली जाते आहे. मात्र, दुसरीकडे प्रशांत महासागरात एल निनोची चाहूल लागली असून युरोपियन सेंटर फॉर मिडीयम रेंज वेदर फोरकास्ट या संस्थेने प्रशांत महासागरात एलनिनोची स्थिती विकसित होत असल्याचं सांगितलं. परिणामी, भारताच्या यंदाच्या मान्सून वर याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

सध्या प्रशांत महासागरात मोठमोठे हवामान विषयक बदल घडत आहेत. या बदलांकडे जगभरातील हवामान तज्ञांचे बारकाईने लक्ष आहे. ईडब्ल्यूएमडब्ल्यूएफ ताजा माहितीनुसार, प्रशांत महासागरातील समुद्राचा तळ एलनिनो ची सुरुवात दर्शवणाऱ्या महत्त्वाच्या मर्यादेपेक्षा अधिक तापला आहे. युरोपियन स्पेस एजन्सीने देखील आपल्या प्रगत उपग्रह यंत्रणेच्या सहाय्याने समुद्राच्या पृष्ठावरील तापमानाने वातावरणीय बदल याकडे लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे. यातून समोर आलेल्या माहितीनुसार प्रशांत महासागरात समुद्राच्या तळाशी तापमान वाढ नोंदवली जात आहे. एलनिनोची चाहूल लागत असल्याने यंदाच्या मान्सूनवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



पृथ्वीच्या हवामानावर नियंत्रण ठेवण्यात प्रशांत महासागराची भूमिका महत्त्वाची आहे. सामान्य परिस्थितीत, पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहणारे वारे उष्ण पाण्याला आशिया आणि ऑस्ट्रेलियाच्या दिशेने ढकलतात. त्यामुळे दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यावर खोल समुद्रातील थंड आणि पोषक तत्त्वांनी समृद्ध पाणी वर येते. या प्रक्रियेला 'अपवेलिंग' असं म्हटलं जातं. मात्र, अन निनोच्या काळात पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहणारे हे वारे कमकुवत होतात. किंवा काही वेळा उलट दिशेने वाहू लागतात. परिणामी पश्चिम प्रशांत महासागरातील उष्ण पाणी पुन्हा अमेरिकेच्या दिशेने सरकते. या उष्णतेच्या पुनर्वितरणामुळे जगभरातील पर्जन्यमान आणि तापमानाच्या पद्धतींमध्ये मोठे बदल होऊ शकतात.

भारतात अल निनोची स्थिती सामान्यतः मान्सूनसाठी अनुकूल मानली जात नाही. आतापर्यंतचा इतिहास पाहिला तर अलनिनो आणि कमी पावसाचा मान्सून यांचा जवळचा संबंध राहिलेला आहे.त्यामुळे कृषी क्षेत्रासह विविध क्षेत्रांवर याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जाते. सध्या अल निनो अधिकृतपणे जाहीर झालेला नाही.तो जाहीर करण्यासाठी तापमानाशी निगडित ही परिस्थिती किमान तीन महिने कायम राहणे आवश्यक असते.

ऑस्ट्रेलियन ब्युरो ऑफ मटेरियलॉजीच्या आकडेवारीनुसार, प्रशांत महासागरातील 'निनो ३.४ ' या महत्त्वाच्या क्षेत्रातील तापमान ०.५ अंश सेल्सिअस पेक्षा अधिक वाढले आहे. अल निनो ओळखण्यासाठी हा आकडा महत्त्वाचा मानला जात आहे.

यंदा मान्सूनने ४ जून रोजी केरळ किनारपट्टी गाठली. सामान्यतः या भागात १ जूनपर्यंत मान्सून दाखल होतो. म्हणजेच यंदा तीन दिवस मान्सून उशिरा पोहोचला आहे.




**नांदेड :** छत्रपती शिवरायांच्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळा येथे शिवरायांचा दुग्धाभिषेक करून साजरा केला. यावेळी छत्रपतींना अभिवादन करताना सर्व शिवभक्त. (छाया : करणसिंह बैस)

# महापालिकेची जुना मोंढा ते रेस्ट हाऊस मुख्य रस्त्यावर अतिक्रमण विरोधी कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने शनिवारी शहराच्या मध्यवर्ती भागातील जुना मोंढा ते शासकीय विश्रामगृह (रेस्ट हाऊस) मार्गावर धडक कारवाई केली. या धडक मोहिमेमध्ये रस्त्यावरील अनाधिकृत टपऱ्या, शेड, दुकानांचे वाढीव ओटे आणि अनधिकृत फलक पूर्णपणे भुईसपाट करण्यात आले आहेत.

शहरातील जुना मोंढा परिसरापासून ते वजिराबाद, कलामंदिर, शिवाजीनगर, आय.टी. आय. चौक ते थेट व्ही.आय. पी. रोडवरील रेस्ट हाऊसपर्यंत रस्त्याच्या दुतर्फा असलेले सर्व कच्चे-पक्के अतिक्रमण जेसीबी आणि पोकलेनच्या साहाय्याने हटवण्यात आले. शहरातील या मुख्य रस्त्यावर व्यापाऱ्यांनी आणि हातगाडी चालकांनी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केल्यामुळे दररोज तीव्र वाहतूक कोंडी निर्माण होत होती. या कारवाईमुळे रस्ता पूर्णपणे मोकळा झाला आहे. या कारवाईदरम्यान कोणतीही कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून स्थानिक पोलीस प्रशासनाच्यावतीने चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. महापालिकेच्या पथकाने रस्त्यावर अडथळा ठरणारे साहित्य, लोखंडी काउंटर आणि इतर अनधिकृत फलक जप्त करून महापालिका कार्यालयात जमा केले आहेत.

सदरील कारवाई पालिका आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार व अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त स.अजितपालसिंघ संधू यांच्या नेतृत्वात अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई पार पाडली.

या कारवाईत पोलीस निरीक्षक मुंडे, शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक संजय साखळे, कोटतीर्थवाले, टोईग वाहन इन्चार्ज



नव्हाते यांच्यासह पोलीस अंमलदार घाडगे, सोनटक्के, चाटे, पोलीस हवालदार केंद्रे व त्यांच्या पथकाच्या सहकार्याने अतिक्रमण विभागाचे सहायक आयुक्त रावण सोनसळे, क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे, गौतम कवडे, अतिक्रमण पथक प्रमुख दत्ता कल्याणकर यांच्यासह महापालिकेचे ३० कर्मचारी तसेच पोलीस विभागातील २० कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

### महापालिका प्रशासनाचा इशारा

शहरातील प्रमुख रस्ते आणि बाजारपेठा अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी महापालिकेची ही मोहीम यापुढेही अशीच सातत्याने सुरू राहणार आहे. व्यापारी आणि नागरिकांनी स्वतःहून आपले अतिक्रमण काढून घ्यावे. या कारवाईनंतर जर कोणी पुन्हा त्याच ठिकाणी अनधिकृत बांधकाम किंवा व्यवसाय थाटण्याचा प्रयत्न केला, तर त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असा कडक इशारा महानगरपालिका प्रशासनाने दिला आहे.

# चारचाकी वाहनाखाली आल्याने चिमुकल्याचा मृत्यू

## बाबा पेट्रोल पंपावरील घटना

**नांदेड (प्रतिनिधी)–** पेट्रोल भरण्यासाठी आपल्या आईसोबत आलेल्या एका दुचाकीवरील अवघ्या ३ वर्षीय चिमुकल्याचा चारचाकी वाहनाखाली आल्याने मृत्यू झाला. सदर हृदयद्रावक घटना शहरातील देगलूर नाका परिसरातील बाबा पेट्रोल पंपाच्या आवारात घडली. या संपूर्ण घटनेचा सीसीटीव्ही व्हिडिओ समोर आला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

शेख शयान शेख वाजिद असे मृत मुलाचे नाव असून तो मूळचा परभणी येथील जमजम कॉलनी परिसरातील



रहिवासी होता. शयानची आई नांदेडमधील नई आबादी भागात माहेरी आली होती. मिळालेल्या माहितीनुसार, कुटुंबिय दुचाकीवरून पेट्रोल भरण्यासाठी शहरातील बाबा पेट्रोल पंपावर आले होते. यावेळी शयान दुचाकीवरून उतरून बाजूला गेला. त्याचवेळी समोरून येणाऱ्या चारचाकी वाहनाच्या चालकाला मुलगा दिसला नाही आणि शयान वाहनाखाली आला. हे पाहताच आईसह कुटुंबियांनी घटनास्थळी हंबरडा फोडला. काही नागरिकांनी धावपळ करून अपघातात जखमी झालेल्या बाळाला रुग्णालयात दाखल केले, मात्र तोपर्यंत उशिर झाला होता. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच इतवारा पोलीस ठाण्याच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अपघात करणारी गाडी क्रमांक (एम.एच.४९ वीडब्ल्यू २५८८) इतवारा पोलिसांनी आणून पोलीस ठाण्यात उभी केली आहे. मात्र अद्यापपर्यंत गुन्हा दाखल झाला नव्हता. कारण शेख शयानच्या नातेवाईकांनी अंतिम क्रिया करून तक्रार देतो, असे पोलिसांना सांगितले आहे.


# इंधनाचा काळाबाजार रोखण्यासाठी राज्य सरकार ॲक्शन मोडवर

**मुंबई (प्रतिनिधी)–** इराण-अमेरिका युद्धामुळे जागतिक इंधन पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून, त्याचा परिणाम देशातील पेट्रोलियम उत्पादनांच्या पुरवठ्यावर झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील पेट्रोल आणि डिझेलचा काळाबाजार आणि साठेबाजी रोखण्यासाठी राज्य सरकार 'ॲक्शन मोड'वर आले आहे. घाऊक (बल्क) औद्योगिक ग्राहकांकडून किरकोळ विक्री केंद्रांवरून (पेट्रोल पंप) होणाऱ्या इंधन खरेदीमुळे सर्वसामान्यांच्या कोट्यातील पुरवठ्यावर प्रचंड ताण येत असल्याचे समोर आले आहे. या साठेबाजीला आणि गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने संपूर्ण राज्यात विशेष तपासणी मोहीम राबवण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये दोषी आढळणाऱ्या संस्था आणि पेट्रोल पंप चालकांवर जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले जाणार आहेत.



**'याराना':**

**नांदेड–** माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण, प्रख्यात दिग्दर्शक- अभिनेते महेश मांजरेकर, नांदेडचे माजी पालकमंत्री डी.पी. सावंत हे मुंबईतील कॉलेज जीवनापासूनचे मित्र! एका नाटकाच्या निमित्ताने महेश मांजरेकर हे नांदेडमध्ये आले असता खासदार अशोकराव चव्हाण यांच्या निवासस्थानी हे मित्र एकत्र आले. त्यानंतर त्यांनी दिलेली ही 'पोझ'.






# बीसीसीआयकडून आयर्लंड अन् इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघाची घोषणा

## ▸ कर्णधारपदी श्रेयस अय्यर ▸ धडाकेबाज वैभव सुर्यवंशीची निवड

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आगामी आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासह जपानमध्ये होणाऱ्या आशियाई खेळांसाठी भारतीय टी-२० संघाची घोषणा केली आहे. अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील बीसीसीआय मुख्यालयात झालेल्या निवड समितीच्या बैठकीत काही अत्यंत धाडसी आणि आश्चर्यकारक निर्णय घेण्यात आले आहेत. टी-२० विश्वचषक २०२६ चा विजेता कर्णधार सूर्यकुमार यादवला धक्का देत निवड समितीने संघाची धुरा श्रेयस अय्यरकडे सोपवली आहे.

या निवडीतील सर्वात मोठा आणि ऐतिहासिक निर्णय म्हणजे १५ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीचा भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. आयपीएल २०२६ च्या हंगामात आपल्या फलंदाजीने संपूर्ण क्रिकेट जगताला थक्क करणाऱ्या वैभवला त्याच्या कष्टाचे फळ मिळाले आहे. सूर्यवंशीने आयपीएल २०२६ मध्ये १६ सामन्यांमध्ये सर्वाधिक ७७६ धावा करून ऑरेंज कॅप जिंकली. त्याने एकाच हंगामात सर्वाधिक ७२ षटकार मारले आणि त्याचा स्ट्राइक रेट २३७.३० होता. वैभवच्या या तुफानी कामगिरीमुळे निवड समितीने त्याला थेट आंतरराष्ट्रीय संघात खेळवण्याचा निर्णय घेतला आहे.

**आयर्लंड दौऱ्यासाठी भारतीय टी-२० संघ :** श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, इशान किशन, शिवम दुबे, तिलक वर्मा (उपकर्णधार), नितीश रेड्डी, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, वैभव सूर्यवंशी.

**इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय टी-२० संघ :** श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, इशान किशन, शिवम दुबे, तिलक वर्मा (उपकर्णधार), नितीश रेड्डी, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, वैभव सूर्यवंशी.

# तहसीलदार विजय चव्हाण ६ लाख रूपयांची लाच घेताना जाळ्यात

**जालना (प्रतिनिधी)–** राज्यातील लाचखोर अधिकाऱ्यांना वठणीवर आणण्याचं काम सध्या एसीबीकडून सुरू असून गेल्या काही महिन्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने छापेमारी करत लाखचोरांना रंगेहात अटक केली. शनिवारी अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांना एका प्रकरणात ६ लाख ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना बीड एसीबीने रंगेहात अटक केली. तत्पूर्वी, जालना एसीबीने बीडमधील नेकनूर येथे जाऊन पोलीस अंमलदारास लाच घेताना अटक केली. या कारवाईमुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे.

जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बीडमध्ये कारवाई केल्यानंतर बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने जालना जिल्ह्यात मोठी कारवाई केली. अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांच्या छत्रपती संभाजीनगर येथील राहत्या घरी सापळा रचून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. अंबड तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातील वाळू उत्खननासाठी पोकलेन व ट्रक सुरू ठेवण्याच्या मोबदल्यात ही लाचेची मागणी केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. एसीबीने लाचेची रक्कम तब्बल ६ लाख ४० हजार रुपये स्वीकारताना तहसीलदार विजय चव्हाण जेरबंद केले. याप्रकरणी, छत्रपती संभाजीनगरच्या सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, या कारवाईने जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

# कौला मातीचं घर



मा ऽऽऽऽ ! व मा ऽऽऽऽ बा आले नाह्यी काय वावरातूनं अखिनं. तुकाराम बोलला. कामूनं बाप्पा अज् लयचं याद येवूनं राह्यली तुले बापाची. कमला बोलली. अव् अज् आपल्या गावचा बझ्झार नाह्यी काय गुजरीत. मले भातकं खा वाटूशी राह्यलं ना! येतीनं नं मंग त्वाले बा कुठसा जातीनं. अज डवऱ्याले बब्बूभाऊच्या वावरात गेले. लयचं दूर हायं थे वावरं. तिसरी अजानं झाल्यावर येतीनं हं ऽऽऽ बाबू. अस् समजावत कमला चा कराले चुलीजौळ गेली. पऱ्हाटीच्या चार काळ्याची मुठ चुलीच्या तोंडात टाकली. सौद्याचा कागद चिळीवर धरला. चूल पेटोली. चूलं लाल पिवया ऊभायाचं लुगळं घालूनं नटली होती. गंजोली चुलीवर जोंधयाच्या कन्सावानी दिसत होती तुर्रेबाज दिसत होती. गुय, पत्ती, अन् चा च जंगली गवत गंजोलीत टाकल्या गेलं. चाले ऊकयी आल्यावर तुक्यानं कबरी बकरी दोयली. बकरीचं घट घट दुद टाकन्यात आलं. चहाचा वास खमननं घरभर कोंदटला होता. सखाराम हा तुक्याचा धाकटा भाऊ खेयता खेयता घरात धावत-पयत आला. मा मले दे नं ऊल्साचा ! अस् म्हनूनसन्या तगादा लावत होता. बाबू लानं लेकरायनं चा पीवू नोयं नाह्यीत आतये भूक मारते. मले पाह्यजे बाई व. मले चा पाह्यजे. असं म्हनत घरात पाय घासत होता.

तुकाराम दा सालचा त सखाराम सा सालाचा झाला होता. पुंडलिकराव अन् कमलाले हे दोनं लेकरं होतं. ऊमरावती जिल्ह्यातलं नांदगाव खंडेश्वर तालुक्यातलं काजना नावाचं तीनशेक घराचं टुमदार गावं. ह्या गावात हरेक घर कौला-मातीच होतं. फकस्त एकचं घरं कुळाचं होतं. थे होतं पुंडलिकाच.

पुंडलिकराव थकूनं भागूनं आला. खांद्यावरला डवरा आंगनाच्या कोपऱ्यात ऊभा केला. खांद्यावरल्या टवालानं घाम पुसत. तुका पानी ठेव रे हातपाय धुवाले. असा अवाज लगावला. कमलानं चुलीवरला चा ऊल्यावर ठेवला. भरलेली बटलई चुलीवर ठेवली. टेम्प अन् गवरीचं पाव खांड चुलीत खोसलं. चिळीचं मुंडक काहाळूनं मातीचं तेलं वातीनं झिल्पीवर टाकलं. चूल भळकली. वाफायलेला ऊल्यावरला चा सिंगलात वतला. नवऱ्याले ताब्याच्या गंगायात गरम झालेलं पानी वतूनं देल्लं. पुंडलिकरावनं हातापायावरूनं खापरं फिरोली. टवालाले हातपाय पुसूनं सदरा-पैज्यामा घातला. खुट्याले टांगलेला झोरा घेतला...

दे बरं ईसक रूपये. बजाराले जावूनं येतो. पुंडलिक टायवरी घालता घालता बोल्ला. बाप्पा माह्याजौळ काहाचे पैसे. देवूनं ठुयले होते काय तुम्हीनं. मंगल्या ईतवारीचं त जोंधये आनाले देल्ले होते. अन् टोंगयाच्यानं आठ रोजापासूनं मी कुठसा गेली भारे बांधाले.

पुंडलिक बोलला. हवं लेकं बराबर हाय त्वालं. बरं पाह्यतो बजारात कोनी पैसा-अदला ऊसना-वासना देते कायं त. असं बोलूनं हिरामननं घरातूनं काहळता पाय घेतला... तितल्यात तुकाराम मांग लागला. बा मी येतो ना बजारात तुमच्यासंग. तू घरीचं थाम्ब बाबू मी बात येतो बजार करूनं. नाह्यी मी येतो म्हनजे येतो. मले काय तुमच्या डोक्शावर बसा लागते काय. येतो मी तुमच्या मांग मांग.

बरं ये त खरी पन् दिसनं थे मंगू नोको. पयलेचं पैसा नाह्यी. कोनी ओयखीचं भेटते काय त पाहा लागनं. हावं बा मी काह्यीचं नाह्यी मांगत. फकस्त भातकं देजा कोन्चही.

असं बोलूनं दोघही बापलेकं गुजरीच्या दिशेनं निंघाले. बजाराच्या एकांग मासोयाचा मयकटलेला वास वाऱ्यावर फिरत होता. कापलेला अन् शिललेला बोकळ्या बांबूच्या तिरीकुटाले टांगलेला होता. बोकळ्याचं डोये खुल्लं असलेलं मुंडक पाटलीवर ठुयेलं होतं. हल्क मटनं डाव्याबाजूनं एकांग ठुयलं होतं. ऊल्श्याचं अंतरावर गढीवर टालाच्या शेजी डंगऱ्याचं मटनं भेटत होतं. दोघही बापलेकं थो वास पारं करत चाल्ले होते. मनीला अन् चड्डुया नये कोरे पाहूनं अन् तेयचा वास घेवूनं तुकाराम लयचं खुस होतं होता. पुंडलिकरावची नजर भिरभिरत होती. कोनाजौळूनं ऊसने घेवू ह्या ईचारानं थो पिसायला होता. लोकायचे टच्च भरेलं झोरे अन् गाठोये पाहूनसन्या त्याचं कायीज थटथट टुटत होतं. बजाराच्या एका कोपऱ्यात हलवायाचं पाल टाकलेलं दुकानं तुकारामाले दिसलं. थ्या पालीतला शेव, चिवळा, शंकरपाळे, बालूशाई, जिल्बी, इमरती, पेळा, कलाकंद,बुंदा, बेसनंलाळवं हे सारं खुनावत त्याच्या तोंडाले पानी सोळतं होते. त दुसऱ्या बाजूनं काये फुटाने, पिव्वे फुटाने, मसाल्याचे फुटाने, दालव्या, खरमुरे, रेतीतले पोंगे, रेतीतल्या लाल पिव्या सया, मुरमुरे हे ही सारं भातकं तुक्याची लायं पाळतं होतं.

तुक्याचं थ्या दुकानाकळे एकटक पाहूनसन्या थुका गीटनं पुंडलिकाच्या जिव्हारी लागूनं गेलं. झोऱ्याले गोलफिरवतं मनगटावर गुंडायला अन् पुंडलिकराव बाल्याले बोल्ला.

काय रे काय पाहूनं राह्यला तिकळे. काह्यी नाह्यी बा. मी ईचार करत होतो अज् कोन्च भातकं घ्याव. तुक्याचे बोलं आयकूनं पुंडलिकराव ईचारात पळ्ळा. कोनं ऊसने देईनं म्हनूनसन्या. बजारभर कलोयं कलोयं चाल्ला होता. जागोजागी पाला थाटल्या होत्या. संध्याकाय होताचं टेंभ्यानं पाला ऊजयल्या होत्या. बजारभर गर्दीच गर्दी ऊसयली दिसत होती. भाजीपाला ईकनारे, तमाखू, चुना, पानं ईकनारे, मसाला ईकनारे, कपळे ईकनारे, टायवरी चपला ईकनारे, गुय ईकनारे, खेयनी ईकनारे, कटलरीचं सामायनं ईकनारे सारे जोरजोऱ्यात अळ्ळावूनं-अळ्ळावूनं गिऱ्हाई-कायले बलावत होते.

भंटोलं पोरं पोरीच्या मांग गू खायऱ्या डुकरासारखे लागले होते. गरदीत धक्केही लावत होते. कुतरे, डुकरं, गाई, बकऱ्या, आक्के अन् मांजरी बजारात चंगळ करत होत्या. दोघही बजारभर फिरूनं ऊसाच्या बंडीजौळ येवूनं ऊभे झाले. ओयखीच्या बऱ्याच लोकाले ऊधार मांगूनं पाह्यलं. कोनीचं द्याले तयार होये ना. सुस्कारा टाकत पुंडलिकराव सोताच्या मनाशी बोल्ला...अगणीक दुखं झेलली म्या ह्या बजाराच्या दिशी. होता रिकामा झोरा अन् बायकोची पिवशी ही. हिरमुसल्या तोंडानं बजारभर नजर फिरवत पाह्यतं होतो दानी ... देईनं काय ऊधार पाधार कोनी. वाऱ्यावर फिरनारा भातक्याचा वास अरे! कायजाले भोक पाळूनं जायं अन् जिभीनं व्हठ चाटे लेकरू अन् पोटात निंघे ऊभायं. बजारभर हाये कल्ला - हल्ला पोत्याखाली दाबल्या जावूनं राह्यल्या नोटा. अजूनही धिर ना सोळ्ळा पुंडलिकरावनं. म्हने थाम्ब काहितरी जुगाळ करतो पोरा.

कायजीनं खोलं गेलेले लेकराचे डोये अन् चालूनं चालूनं पोटाऱ्याले आलेले गोये. त्याच्या टाचायच्या भेगायातली माती लळे कायाभोरं शेव्या काळतं हात चोये. भरलेले लोकायचे झोरे . कोनाच्या बायकोले लुगळे कोरे पाहूनं बांधूनं ठेवला अख्खया एल्गाराले कंबरिले, मनगटाले अन् पायाले लाल काये दोरे. मनाले वाटलं 'राहूदे रिकामा झोरा' छटाकभर लेकराले भातकं त घेवू मांगलच देन होतं बाकी ह्या ईचारात मन पळ्ळ होतं धाकी. बापाचा पळेल काया ठिक्कर मुखळा पाहूनं तुक्यानं म्हतलं. बाबा राहूद्या मंग हो या बारीनं भातकं. खा च लागते काय दर बजाराले....तव्हा पुंडलिकराव एका लेकरावानी तुक्याले पोटाशी घेवूनं ढसढसा लळला. किती समजदार माह्यं लेकरू बापा.

बापाचे सारे आसवं आताही तुक्यानं त्याच्या पांढ्या मनिल्यात कैद करून ठेवेलं हायं.गरिबीचे दिवस अन् बापाचे मोती म्हनूनसन्या.....आजही तुक्यानं थो सदरा धुतला नाही. बापाच्या आसवाचा अमर अत्तर अन् जगन्यासाठी ऊर्मी अन् ऊर्जा देनारा थो आसवाचा सदरा अन् रिकामा झोरा आताही एका अभेद्द अश्या पोलादाच्या तिजोरीत जतनं केलेला हायं कायमचा.

**- सु. पुं. अढाऊकर**
अकोला
मो. ९७६९२०२५९७


---

# हरवलेला माणूस शोधून देणारे पुस्तक 'माणूस द्या...मज माणूस'

**पुस्तक परीक्षण**

**नासा येवतीकर**
मुख्याध्यापक
प्रा. शाळा पिंपळगाव, धर्माबाद
मो. ९४२३६२५७६९

माणूस कोणाला म्हणावे ? माणूस म्हणजे




फक्त दोन हात, दोन पाय आणि बोलण्याची क्षमता असलेला जीव नव्हे.

ज्याच्या मनात प्रेम, दया, क्षमा, शांती, करुणा, संवेदना आणि इतरांविषयी आदर असतो, त्यालाच खरा माणूस म्हणावे.

स्वतःसाठी जगणे सहज शक्य असते; पण दुसऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, गरजूंना मदत करणे, सत्य आणि प्रामाणिकपणाने वागणे, चूक मान्य करून सुधारण्याचा प्रयत्न करणे, ही खरी माणुसकीची लक्षणे आहेत.

ज्याच्याकडे पैसा, पद किंवा सत्ता आहे तो मोठा असू शकतो; पण ज्याच्याकडे चांगले विचार, नम्रता आणि माणुसकी आहे तोच खरा माणूस असतो.

संत तुकाराम महाराज म्हणतात,
जे का रंजले गांजले
त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधू ओळखावा
देव तेथेचि जाणावा.

यातूनही हेच स्पष्ट होते की, दुसऱ्यांच्या दुःखात साथ देणारा आणि प्रेमाने वागणारा व्यक्तीच खरा माणूस असतो.

सध्याच्या धावपळीच्या युगात माणसातली माणुसकी लयाला गेली आहे, याचा प्रत्यय रोजच्या वर्तमानपत्रातील बातम्यावरून आणि आपणाला येत असलेल्या अनुभवावरून लक्षात येत आहे. आज समाजातून माणूस हरवला आहे आणि तो माणूस शोधण्यासाठी विनोद श्रा. पंचभाई यांनी माणूस द्या... मज माणूस.. हे पुस्तक लिहिलं आहे. प्रसिद्ध साहित्यिक विंदा करंदीकर यांनी म्हटल्याप्रमाणे माणूस मोठा की पैसा मोठा ? प्रश्न अजूनही उभाच आहे. आजही समाजात माणसापेक्षा पैश्याला जास्त महत्व दिले जाते. जिथे पैसा आहे तिथे माणुसकी औषधाला देखील शिल्लक राहत नाही, ही वस्तुस्थिती नाकारून चालत नाही. अमाप संपत्ती असूनही ज्याचे पाय जमिनीवर असतात अशी व्यक्ती फार कमी बघायला मिळतात.

लेखकांनी आपल्या पुस्तकात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित ग्रामगीता या पुस्तकातील अनेक रचना अगदी समर्पक रित्या वापरून माणसाच्या स्वभावाचे चित्रण केले आहे. या भारतात बंधूभाव नित्य वसू दे, दे वरची असा दे ही राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची प्रार्थना प्रत्येक व्यक्तीने नुसते तोंडपाठ करून चालणार नाही तर त्याप्रमाणे कृती देखील आवश्यक आहे. तेव्हा कुठं माणुसकी जिवंत राहू शकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केलेला आहे. संत कबीर यांचे दोहे देखील मानवाला चांगले जीवन जगण्याचा संदेश देतात. लेखकांनी योग्य प्रकारे संत कबीर यांच्या दोह्याचा वापर करून चांगले जीवन जगण्याचा अर्थ सांगितला आहे. संत कबीर म्हणतात,

बुरा जो देखन मैं चला,
बुरा न मिलिया कोय;
जो मन खोजा आपना,
मुझसे बुरा न कोय.

मराठीत एक म्हण आहे, दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ दिसते पण स्वतःच्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही. माणूस स्वतःचे दोष लपवितो आणि दुसऱ्याचे दोष दाखवत सुटतो. ज्यावेळी आपण कोणाकडे बोट दाखवतो त्यावेळी आपण हे विसरतो की चार बोटं आपल्याकडे निर्देश करतात. म्हणून दुसऱ्या व्यक्तीच्या अंगातील चांगल्या गुणाकडे बघावं आणि त्याचा स्वीकार केल्यास आपली प्रगती होते असा संदेश ते या पुस्तकातून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

माणसाचे जीवन केवळ स्वतःपुरते मर्यादित नसावे. तो कुटुंब, समाज आणि राष्ट्र यांच्याशी जोडलेला असावा. प्रेम, माया, सहकार्य, दया, करुणा, प्रामाणिकपणा आणि माणुसकी हे गुण माणसाला इतरांपेक्षा वेगळे बनवतात. एखाद्याकडे पैसा, सत्ता किंवा प्रसिद्धी असली तरी त्याच्यात माणुसकी नसेल तर त्याचे जीवन अपूर्ण वाटते. म्हणून जीवनात माणूस होणे हेच सर्वांत मोठे यश आहे, हे यापूर्वी संतांनी सांगून गेले आहेत. त्याच तत्वावर हे पुस्तक लिहिले गेले आहे.

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे जग खूप पुढे गेले आहे. माणसाने चंद्रावर पाऊल ठेवले, अनेक शोध लावले आणि जीवन अधिक सुखकर केले. पण या प्रगतीसोबत माणसामधील संवेदनशीलता कमी होत चालली आहे. स्वार्थ, मत्सर, अहंकार आणि द्वेष यामुळे अनेकदा माणूस माणसापासून दूर जात आहे. एकाच छताखाली असलेल्या चार माणसांमध्ये आज संवाद कमी झालेलं दिसून येत आहे. अशा वेळी प्रेम, आपुलकी आणि माणुसकीने एखाद्याला जवळ घेण्याची गरज अधिक जाणवत आहे.

लेखकांच्या मतानुसार चांगल्या विचारांनीच माणूस घडत असतो. सकारात्मक विचार करणाऱ्याची प्रगती लवकर होताना दिसून येते. म्हणून नेहमी सकारात्मक विचार करणे आवश्यक आहे. लहान मुले ही निरागस असतात पण ते जसे जसे मोठे होत जातात तसे तसे त्यांच्यात ईर्षा, द्वेष, राग, लोभ आणि अहंकार इत्यादी दुर्गुण चिकटत जातात. त्यामुळे त्याच्यातील माणूसपण हरवत जाते. आज समाजात शिक्षणाचा एवढा प्रसार होऊन देखील बुवाबाजी, कर्मकांड आणि अंधश्रद्धा खूप वाढू लागली आहे. त्यामुळे संधीसाधू लोकांपासून सावध होण्याचा सल्ला देखील वाचकांना देतात.

विभक्त कुटुंब पद्धतीमुळे घरातील लहान मुलांवर योग्य संस्कार होत नाहीत, याची खंत देखील लेखकांनी व्यक्त केली आहे, जे की योग्य वाटते. एक खोटं लपविण्यासाठी शंभरवेळा खोटं बोलावे लागते. म्हणून सजन रे झूठ मत बोलो या प्रकरणात सत्याचे महत्व स्पष्ट केले आहे. लेखक स्वतः डावखुरा असल्याने जगातील १२ टक्के डावखुरा असलेल्या व्यक्तिमत्वाविषयी छान माहिती दिली आहे. वेळ कोणासाठी थांबत नसते. त्यामुळे वेळेला महत्व द्यावे असा सल्ला देतात. देशभक्ती दाखवण्यासाठी सीमेवर जाऊन कार्य करावे लागते असे नाही तर छोट्या छोट्या गोष्टीतून देखील आपण आपले देशावर असलेले प्रेम दाखवू शकते यांचे सुंदर उदाहरणं दिले आहेत.

शिक्षण माणसाला ज्ञानी बनवते, पण संस्कार त्याला चांगला माणूस बनवतात. त्यामुळे लहानपणापासूनच चांगले विचार, शिस्त, आदर आणि सहकार्य यांचे महत्त्व मुलांना शिकवले पाहिजे. बालपणी केलेले संस्कार चिरकाल टिकतात, म्हणून त्या छोट्या वयात मुलांवर संस्कार टाकण्याची जबाबदारी पालकांची, शिक्षकांची आणि समाजाची आहे. कारण चांगल्या माणसांमुळेच चांगला समाज घडतो, देश घडतो. खरा माणूस तोच असतो जो दुसऱ्यांच्या दुःखात सहभागी होतो, गरजूंना मदत करतो आणि सर्वांना समानतेने वागवतो. जात, धर्म, भाषा किंवा श्रीमंती यापेक्षा माणूस हा धर्म मोठा आहे. समाजात शांतता आणि सौहार्द टिकवण्यासाठी प्रत्येकाने माणुसकी जपली पाहिजे, असा मौलिक संदेश अनेक प्रकरणात दिसून येतो.

या पुस्तकात माणसाने माणुसकी कशी जपावी याबाबत एकूण ३७ प्रकरण आहेत. प्रत्येक प्रकरण वाचल्यानंतर चिंतन आणि मनन करण्याजोगे आहे. विशेष म्हणजे प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी स्लोगन दिलेलं आहे, ज्यामुळे त्या प्रकरणाचा सार लक्षात येतो. आबालापासून वृद्धापर्यंत सर्व प्रकारच्या वाचकासाठी हे पुस्तक एक समुपदेशनाचे काम करणारे आहे. सोपी वाक्यरचना, कमी शब्दात जास्त महत्व सांगणारे प्रकरण, प्रसंगानुरूप दाखले, उदाहरण, अनुभव आणि प्रसंगामुळे हे पुस्तक वाचनीय आणि संग्रही असावे असे आहे. उदास मनाला प्रफुल्लित करणारे, जीवन नकोसे वाटणाऱ्या व्यक्तीला पुस्तक वाचल्यावर जीवन हवेहवेसे वाटेल इतके मार्गदर्शन या पुस्तकात वाचायला मिळेल. संतोष घोंगडे यांचे मुखपृष्ठ लाजवाब आहे. पुस्तकाविषयी सर्व काही मीच सांगण्यापेक्षा प्राजक्त प्रकाशन द्वारे प्रकाशित झालेले हे पुस्तक ९९२३७९७७२५ या क्रमांकावर संपर्क करून नक्की मागवावे. लेखकांना पुढील लेखनासाठी खूप साऱ्या शुभेच्छा...!

**पुस्तकाचे नाव - माणूस द्या.. मज माणूस..**
**लेखक - श्री विनोद श्रा. पंचभाई**
**प्रकाशक - प्राजक्त प्रकाशन, पुणे**
**पृष्ठ - १३६ किंमत - २०० रुपये**

---

## काय पुण्य काय पाप ?

समजून घ्यावे जरा
काय पुण्य काय पाप ।
पुण्य होत नाही काही
नित्य करुनिया जाप ।।

मन दुखेल कोणाचे
असे कर्म करणारे ।
कोण आहेत जगती
छानपैकी जगणारे ।।

अत्याचारी माणसांना
मृत्यू सुद्धा छळणार ।
भोग भोगायच्या आधी
दुष्ट कोण मरणार? ।।

पुण्यवान होत नाही
दान देवालयी देता ।
दुष्ट ठरणार नाही
कोणी मदतीला येता ।।

देव असमर्थ नाही
देव सर्वशक्तिमान ।
आपणास देव देतो
मागणार नाही दान ।।

घाण असता मनात
बिनकामी स्वच्छ तन ।
आत मधल्या घाणीला
काय करेल साबण? ।।

माणसांनी माणुसकी
जपायला हवी फक्त ।
देशभक्त म्हणजेच
जाणायचे देवभक्त ।।

**-शब्दसखा-अजय रमेश चव्हाण,**
तरनोळी ता.दारव्हा, जि.यवतमाळ
मो. ८८०५८३६२०७

---

# निरागस मुलांना समजून घेताना...

कधी कधी आपण मुलांना आपली प्रतिकृती समजतो ते ग्राह्य धरूनच आपण त्यांच्याशी बोलतो, त्यांना सूचना देतो. उपदेशाचे डोस देत असतो. सतत न संपणाऱ्या आदेशाचे मुलांनी निमूटपणे पालन करावे ही आपली पर्यायाने पालकांची इच्छा असते. त्यात आई-वडील यांचा दृष्टीकोन नेहमी विधायक असतो. पण नेहमी कळत नकळत आपण त्यांच्या अभिव्यक्ती दाबून टाकण्याचा प्रयत्न करीत असतो. आपण त्यांचं म्हणणं ऐकलं पाहिजे. त्यांना काय म्हणायचं आहे ते समजून घेतलं पाहिजे. त्यांच्या डोक्यातही अनेक कल्पक विचार असतात. हे कल्पक विचार किती उपयुक्त असतात हे परवाच माझ्या मुलीकडून मी एका प्रसंगाच्या निमित्ताने अनुभवले.



खरं तर माणसाने व्यक्त व्हायला हवे, कुणी शब्दाच्या माध्यमातून आपल्या भाव भावना आपल्या साहित्य कृतीतून व्यक्त करतं, तर कुणी आपली वक्तृत्व कलेच्या माध्यमातून व्यक्त होतअसते, चित्रकला, शिल्पकला अशा विविध माध्यमातून व्यक्त होत असतो. व्यक्त होणं हा मानवी स्वभाव. अभिव्यक्ती ने मनाला फार हलकेपणा जाणवतो. मनाचं भावविश्व अधिक समृद्ध व्हायला मदत होते. आत्मविश्वासाची तलवार अधिक धारदार होते. अभिव्यक्ती ह्या साठलेल्या भावनांना मार्ग मोकळा करून देण्याच कार्य करीत असतात. आणि नित्य नव्या कल्पना सुचविण्यासाठी सर्जनशीलतेची वाढ होण्यासाठी आवश्यक असतात. मनात अशा प्रकारच्या भावनांची जागा अधिक भक्कम करीत असतात. म्हणून कुठल्या न कुठल्या माध्यमातून व्यक्त व्हायला पाहिजे. अभिव्यक्ती त असे सातत्य कायम स्वरूपी असायला पाहिजे. मग विचारात गफलत होत नाही. आणि कुणी करण्याचा प्रयत्न केला तरी, आपल्या लेखी त्याची परिणामकारकता वाढत नाही.

भविष्यात आशा विचाराची पायाभरणी बालवयात होत असते. म्हणून अभिव्यक्ती वाढेल असे प्रयत्न एक पालक म्हणून शिक्षक म्हणून अधिक जाणीवपूर्वक करायला हवेत. हे माझ्या मुलीच्या बोलण्यातून, विचारातून मी नव्याने शिकले.आठ नऊ वर्षाच्या वयामध्ये किती वेगळया पद्धतीने विचार करण्याची रीत, विचारात तर्कसंगत कल्पकता, चौफेर विचारांची व्यापकता, अनेक माध्यमातून मिळालेलं शिक्षण, प्रत्यक्ष व्यवहारात वापरण्याचं कौशल्य त्यांच्यात आपल्या पिढी पेक्षा लवकर आत्मसात केलेलं दिसतंय. जनरेशन गॅप तर नक्कीच आहे, पण एक पालक म्हणून या अर्थाने दिशादर्शक आहेत.

लहान मुले मोबाईल, टीव्ही, कॉम्पुटर, नेट या गोष्टींच्या आहारी गेले आहेत, अशी ओरड आपण चहू बाजुंनी करतो. खूपदा या गोष्टींमध्ये बरेचसे तथ्यही असते. आई वडील नोकरी करीत असताना पालक बऱ्याचदा कामाला प्राधान्य देत असतो. मुलांच्या आपल्यावरील हक्काचा वेळ आपण नित्य नवीन साधनांशी परिचय करून देण्यात घालवतो. मग त्या साधनांविषयी महत्त्वाची जागा आपल्या मुलांच्या मनात नकळत तयार होते. पण मूल केवळ शाळेतून, पुस्तकातूनच शिकतात असे नव्हे. आपल्या परिसरातून, आपल्या मित्र मैत्रिणी कडूनही अनेक गोष्टी शिकतात. खुपदा पालक म्हणून आपलं सांगणं मुलांना पटत नाही. किंबहुना आपल्या सांगण्यातून ती गोष्ट मुलं ऐकून कृतीत आणत नाहीत. शेजारच्या काकुंच म्हणणं अधिक लवकर पटतं. आणि लगेचच कृतीतही दिसून येतं.

लहानलहान वर्गातील मुले शिक्षिकेच्या असण्यात दिसण्यात, बोलण्यात, वेगळं विश्व शोधतात. एखादी मुलगी येते, पदराला हलकासा स्पर्श करून जाते. या पदराच्या स्पर्शाने काय बर तिला मिळत असेल, कोणत्या भावना, कोणत्या जाणीव, समृद्ध होत असतील ? पहिली दुसरीतल्या विशेषतः मुलींच्या भावविश्वात या गोष्टींचं काय मोल असेल? असं अनेकदा वाटत होतं, कदाचित त्या रुपात स्वतःला तर पहात नसतील, ताण-तणाव असताना एखाद फुललेल फुल, एखाद गोड हास्य यांनी या प्रश्नाचं उत्तर दिल नंतर मात्र वर्गातील या लहान सहान कृती ही महत्वाच्या वाटू लागल्या.

नव्या कोऱ्या वहिवर बाई तुमच्या हातानं नावं टाका ना म्हणत लाडावणारी मुलं शाळेतून जाताना तितक्याच तन्मयतेने मॅडम बाय बाय म्हणणारी मुले, कित्येकदा गाडीच्या मागे पळणारी मुले, खुपदा गाडी-मध्ये बसण्याची इच्छा मनात ठेवणारी मुलं त्यांच्या लहान भाव विश्वाचं दर्शन घडवीत असतात. एक चॉकलेट दिल की खळकंन चेहऱ्यावर ओघळणारे हास्य, चेहऱ्यावरील चमक हे सारच किती मूल्यवान आनंद देणारं.. निरागसतेच प्रतिक असणाऱ्या गोष्टी एक शिक्षक म्हणून नकळत त्यांच्याशी आपली नाळ जोडतात.

**-अनिता दाने-जुंबाड**
नांदेड
मो.७७७५८३०७४०

# लोहा शहर - हरित शहरासाठी १ लक्ष ५१ हजार वृक्षारोपण व संवर्धन लोकचळवळ व्हावी -आ. प्रतापराव पाटील चिखलीकर

**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा परिसर 'हरित शहर करण्यासाठी १ लक्ष ५१ हजार वृक्षारोपण व त्याचे संवर्धन करण्यासाठी लोहा शहरातील सर्व नागरिकांनी पुढाकार घ्यावा, ही लोकचळवळ व्हावी, असे प्रतिपादन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.



या मोहिमेंतर्गत शहरात वृक्ष लागवड करण्यात येणार असून, हे वृक्षारोपण शहरातील शासकीय कार्यालय, शाळा-महाविद्यालय परिसरात करण्यात येणार आहे. तेव्हा प्रत्येकांनी घरासमोर एक झाड लावावे, त्याची जोपासना करावी ज्यामुळे येत्या काळात शहर सुंदर, स्वच्छ व हरित होईल, असे आवाहन विधिमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

शहरातील बाळाजी पाटील पवार मंगल कार्यालयात युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पवार, नगरसेवक श्याम पाटील व कुटुंबियांच्यावतीने 'धोंडे जेवन' आयोजित केले होते.

यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आ. मोहनअण्णा हंबर्डे, माजी आ. सुभाष साबणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, सचिन पाटील चिखलीकर, पं. स. माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी सभापती बालाजी पाटील मारतळेकर, माजी सभापती खुशाल पाटील पांगरीकर, कंधार कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय देशमुख, उपसभापती सुधाकर कौसल्ये, कंधारचे उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी, रंगनाथराव भुजबळ, बाबुराव केंद्रे, बाबुराव पाटील गिरे, स्वप्नील लुंगारे, हंसराज पाटील बोरगावकर, गुरू अप्पा धोंडे, मारोतराव पाटील बोरगावकर, अण्णासाहेब पवार, दत्ता वाले, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, उपनगराध्यक्ष करिम शेख, वाले, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, गटनेता भास्कर पवार, बी. डी. जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले की, नगराध्यक्ष शरद पवार व टीम शहरासाठी चांगले काम करत आहे. लोहा शहर-हरित शहर करण्यासाठी सर्व पक्षीय मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्रित येण्याची गरज आहे. १ लाख ५१ हजार वृक्ष लागवड करण्याचा संकल्प असून, त्यासाठी सर्व शासकीय कार्यालये, दवाखाना, तहसील कार्यालय, नगर पालिका क्षेत्र, शहर व परिसरातील शाळा, महाविद्यालये, मोकळ्या जागा परिसर नॅशनल हायवे, कंधार रोड, शहरातील रस्ते, प्रत्येक घरासमोरील जेथे मोकळी जागा तेथे वृक्ष लागवड करण्यात येणार आहे, त्यासाठी सर्व शहरातील नागरिकांनी पुढाकार घ्यावा. झाड लावणे व त्याचे संवर्धन केले तर येत्या तीन-चार वर्षात शहर हरित होईल. खऱ्या अर्थाने या राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण होणार आहे. झाडांना पाणी टाकण्यासाठी नगर पालिका, सेवाभावी संस्था याचा पुढाकार राहणार असून लिंब वड, पिंपळ तसेच सावली देणारी वृक्ष नगरपालिका व सामाजिक वनीकरण देणार आहे. तेव्हा शहरातील नागरिकांनी यासाठी पुढाकार घ्यावा, वृक्षारोपण ही लोकचळवळ व्हावी, असे आवाहन आ. चिखलीकर यांनी केले आहे.

# लोकप्रशासनाच्या क्षेत्रात संशोधन, प्रशिक्षण व प्रशासकीय सुधारणेला नवी दिशा

## 'आयआयपीए' व 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये शैक्षणिक व प्रशासकीय सहकार्यासाठी सामंजस्य करार



**नांदेड (प्रतिनिधी)**– लोकप्रशासनाच्या क्षेत्रात संशोधन, प्रशिक्षण व प्रशासकीय सुधारणा यांना चालना देण्यासाठी नवी दिल्ली येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्यात दि. ४ जून रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे लोकप्रशासन विषयातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशासकीय कामकाजाचा अनुभव मिळण्याबरोबरच संशोधन व सुशासनाच्या क्षेत्रात नवे आयाम निर्माण होणार आहेत.

भारत सरकारच्या कर्मचारी, लोक तक्रार व निवृत्तीवेतन मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेली आयआयपीए ही लोकप्रशासन क्षेत्रातील देशातील सर्वोच्च संस्था मानली जाते. नांदेडचे जिल्हाधिकारी तथा आयआयपीए नांदेड शाखेचे पदसिद्ध अध्यक्ष राहुल कर्डिले (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच नांदेड येथे या संस्थेची शाखा स्थापन करण्यात आली आहे.

विद्यापीठातील कुलगुरू दालनात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, आयआयपीए नांदेड शाखेचे सचिव डॉ. बी. आर. कतुरवार, नवोपक्रम विभागाचे संचालक डॉ. एस. जे. वाढेर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, डॉ. दीपक वाघमारे, डॉ. मीरा फड आणि डॉ. चांदोबा कहाळेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सामंजस्य करारांतर्गत लोकप्रशासन व सामाजिक शास्त्रातील संशोधनाचा उपयोग प्रशासकीय सुधारणा आणि विविध विकासात्मक योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी करण्यात येणार आहे. बी. ए. व एम. ए. लोकप्रशासनच्या विद्यार्थ्यांना जिल्हाधिकारी कार्यालय, जि. प., महानगरपालिका आदी कार्यालयांमध्ये ऑन-द-जॉब ट्रेनिंग, इंटर्नशिप, क्षेत्रभेटी आणि प्रकल्प अभ्यासाच्या माध्यमातून प्रत्यक्ष प्रशासकीय अनुभव घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

# भाजपच्यावतीने वृक्षारोपण कार्यक्रम



**नांदेड (प्रतिनिधी)** –विश्व पर्यावरण दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी नांदेड महानगरच्या वतीने नाना-नानी पार्क येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी महापौर कविता मुळे, मंगला निमकर, मोहिनी येवनकर, पर्यावरण दिन कार्यक्रमाच्या महानगर संयोजक सौ. सुषमा थोरात, सहसंयोजक ज्योती कल्याणकर, मंगला धुळेकर, अनिता हिंगोले, छाया कळसकर, अपर्णा चितळे, मालिनी नांदेडकर, मनमोहनकौर जंगी, विजय येवनकर, शीतल खांडील, दिलीप ठाकूर, विजय गंभीरे, नगरसेवक सुमित मुथा, सलाम चावलवाला, सतीश बेरोळकर, भाजपा युवा मोर्चा महानगराध्यक्ष शशिकांत क्षीरसागर, शिवा लोट, बालाजी पाटील बोकारे, करण चव्हाण, कंठेश जोगदंड, कामन पाटील, जनार्दन वाकोडीकर, अनिकेत कदम, ॲड. रमेश धात्रक यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि हरित नांदेड घडविण्याचा संकल्प करण्यात आला.

# विज्ञान, साहस व छंद शिबिरार्थ्यांच्या जंगल भ्रमंतीत माहिती घेत पर्यावरण दिन साजरा

**किनवट (प्रतिनिधी)**– जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारत जोडो युवा अकादमी व राष्ट्र सेवा दल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञान, साहस व छंद शिबिरातील १४४ शिबिरार्थ्यांनी बेंदी वन विभागाच्या जंगलात शैक्षणिक व पर्यावरण जनजागृती भ्रमंती केली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वनसंवर्धन, जैवविविधता आणि पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवातून समजावून देण्यात आले.



यावेळी शिबिरार्थ्यांनी बेंदी गावातून पर्यावरण जनजागृती दिंडी काढून आकर्षक झांज पथकाचे सादरीकरण केले. पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण आणि नैसर्गिक संसाधनांच्या संरक्षणासंदर्भातील घोषणा व नारे देत विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.

प्रादेशिक वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने बेंदी वनक्षेत्रातील नर्सरी येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. वनपाल सुनिल खामखर यांनी बेंदी परिसरातील वनसंपदा, विविध वृक्षप्रजाती, वन्यजीव आणि पर्यावरणीय संतुलनातील त्यांच्या भूमिकेची सविस्तर माहिती दिली. तसेच वनसंपत्तीचा मानवी जीवनावर होणारा सकारात्मक परिणामही विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. वनपाल बालाजी झंपलवाड यांनी नर्सरीतील रोपवाटिका व्यवस्थापन, वाफे तयार करण्याची पद्धती आणि विविध वनस्पतींच्या प्रजातींबाबत माहिती दिली. प्रादेशिक वन अधिकारी संघई यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना जागतिक पर्यावरण दिनाच्या शुभेच्छा देत पर्यावरण संरक्षणासाठी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

यावेळी 'प्रकल्प प्राणवायू' संस्थेचे ॲड. सुनिल येरेकार यांनी विद्यार्थ्यांना वनांचे महत्त्व पटवून दिले. वनसंवर्धन ही काळाची गरज असून, श्रमश्री बाबा आमटे यांनी दिलेला पर्यावरण संरक्षणाचा संदेश आपण सर्वांनी आचरणात आणला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

किनवट परिसरातील वृक्षतोडी विरोधात आपल्या संस्थेने केलेल्या कायदेशीर लढ्याची माहिती देत, पर्यावरण रक्षणासाठी नागरिकांनी सजग राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अशोक बेलखोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या शिबिरातील जंगल भ्रमंतीचे नियोजन प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे यांनी केले. कार्यक्रमात प्रादेशिक वन अधिकारी श्री. संघई, वनपाल प्रकाश सूर्यवंशी, बालाजी भुरके, सुनिल खामखर, राहूबाई गिते, दांडेगावकर आणि केशव वानोळे यांचा शिबिराच्या वतीने ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला. मुख्य प्रशिक्षक सदाशिव मकदूम, ॲड. सुनिल येरेकार, मुख्याध्यापक राम भुसमवार, आरती नागपुरे, प्रशिक्षण सहायक शौर्य भोसले, सहायक संयोजक सीमा सरपोतदार, प्राचार्य प्रेमचंद बसी आणि नागेश देवतळे यांनी सत्कार सोहळ्यात सहभाग घेतला.

सदरील जंगल भ्रमंती यशस्वी करण्याकरिता साने गुरुजी रुग्णालयातील कार्यकर्ते, पोतदार इंग्लिश स्कूलचे डॉ. कागणे व त्यांचे सहकारी वन विभागाचे कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन वनपाल सुनिल खामखर यांनी मानले.

# गुरुतत्त्व,संस्कार आणि समाज परिवर्तनाचा संदेश; सामुदायिक श्री गुरुचरित्र पारायणाची सांगता

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– गुरुतत्त्व प्रदीप, नांदेड यांच्या वतीने हडको येथील दतकृपा मंगल कार्यालय येथे आयोजित सामुदायिक श्री गुरुचरित्र सारामृत पारायण, श्री गुरुचरित्र कथामृत व नामभक्ती सोहळ्याची ६ जुन रोजी भक्तिमय वातावरणात सांगता झाली, पुण्यपावन अधिक मासानिमित्त आयोजित या चार दिवसीय सोहळ्यात ४५० स्त्री-पुरुष भाविकांनी सामूहिक पारायणात सहभाग घेतला, तर सांगता दिनी आयोजित महाप्रसादाचा लाभ सुमारे परिसरातील शेकडो भाविकांनी घेतला.




सांगता सोहळ्याप्रसंगी प. पू. श्री मकरंद महाराज, पिठाधीपती, श्री क्षेत्र दत्तधाम, परभणी यांनी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना गुरुतत्त्व, गुरुभक्ती, गुरुसेवा, संस्कार, समाजजागृती आणि राष्ट्रनिर्मिती यांचा परस्परसंबंध अत्यंत सोप्या व कालसुसंगत भाषेत उलगडून सांगितला, गुरुतत्त्व म्हणजे केवळ व्यक्तिपूजा नसून समाजाला योग्य दिशा देणारे चैतन्य आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात अध्यात्म ही काळाची गरज बनली असून दैनंदिन व्यवहार सांभाळत असतानाही साधना, नामस्मरण, सेवा आणि समर्पण यांद्वारे संतुलित जीवन जगता येते. कुटुंबव्यवस्था मजबूत करण्यासाठी संस्कार, संस्कृतीचे जतन आणि पुढील पिढीपर्यंत मूल्यांचा वारसा पोहोचविणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.पुढील काळात गुरुतत्त्व प्रदीप परिवार केवळ पारायण, कथामृत आणि नामभक्तीपुरता मर्यादित न राहता समाजोपयोगी आणि राष्ट्रहिताच्या विविध उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देणार असल्याची माहिती त्यांनी दिली. पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, जलसाक्षरता व जलनीती जनजागृती, संस्कारवर्ग, युवक प्रबोधन, व्यसनमुक्ती, ज्येष्ठ नागरिकांसाठी सेवाकार्य, निराधार व वृद्धांच्या सेवेसाठी उपक्रम, गोसंवर्धन,ग्रामविकास, सामाजिक एकात्मता आणि सांस्कृतिक वारसा जतन यांसारख्या विविध क्षेत्रांत कार्य विस्तारण्याचा संकल्प गुरुतत्त्व प्रदीप परिवाराने केला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

धर्म आणि राष्ट्र बळकट करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी परस्पर सहकार्य, समन्वय आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. समाजातील विघटनकारी प्रवृत्ती, संस्कारांचा अभाव आणि पर्यावरणीय संकटांवर मात करण्यासाठी अध्यात्म आणि सामाजिक जबाबदारी यांचा संगम घडविणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.यावेळी त्यांनी येत्या ३० ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत श्रीक्षेत्र तुळजापूर येथे आयोजित 'श्री दत्त दुर्गा महाअनुष्ठानम्' या भव्य आध्यात्मिक सोहळ्याची माहिती दिली.

# मुदखेडमध्ये ४० वर्षांपासून प्रलंबित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा लवकरच उभारणार

## खा. अशोकराव चव्हाणांच्या आश्वासनानंतर उपोषण मागे

**मुदखेड (प्रतिनिधी)**– शहरातील भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचा गेल्या ४० वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न लवकरच मार्गी लावला जाईल, असे आश्वासन माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी दिले. या आश्वासनानंतर गेल्या १२ दिवसांपासून सुरू असलेले मारोती डुबूकवाड यांचे आमरण उपोषण अखेर मागे घेण्यात आले. खा. चव्हाण यांनी मुदखेड येथील उपोषणस्थळाला भेट देऊन आंदोलकांशी सविस्तर चर्चा केली.



मुदखेड येथील शिवाजीनगर भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या जागेवर गेल्या १२ दिवसांपासून मारोती डुबूकवाड हे आमरण उपोषणाला बसले होते. ४० वर्षांचा प्रदीर्घ काळ उलटूनही पुतळा उभारणीचे काम रखडल्याने स्थानिक नागरिकांमध्ये आणि आंबेडकरवादी अनुयायांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. डुबूकवाड यांच्या आंदोलनाला शहरातून मोठा पाठिंबा मिळत होता आणि दिवसेंदिवस त्यांची प्रकृती खालावत चालली होती.

खा. अशोकराव चव्हाण यांनी उपोषणकर्ते डुबूकवाड यांची भेट घेतली. यावेळी बोलताना खा. चव्हाण म्हणाले की, सुप्रीम कोर्टाने महापुरुषांच्या पुतळा उभारण्यात काही निकष्ट दिले आहेत, त्याबाबत जिल्हास्तरीय समिती निवडून समितीचा अहवाल आल्यानंतर प्रशासकीय पातळीवर या प्रश्नाचा पाठपुरावा करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा लवकरच उभारण्यात येईल, असा शब्द दिला.

# मराठी विषयात संजय आठवले यांना पीएच.डी. प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील संजय नामदेवराव आठवले यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाअंतर्गत मराठी या विषयात पीएच.डी प्रदान केली आहे. त्यांच्या व्हायव्यासाठी भाषा संकुलाचे संचालक व चेअरमन प्रो. डॉ. पृथ्वीराज तौर, मार्गदर्शक प्रो. डॉ. दत्ता शिंदे व बाह्य परीक्षक डॉ. दिनेश वाघुंबरे बाह्य परीक्षक हे उपस्थित होते.



संजय आठवले यांनी प्रो. डॉ. दत्ता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'आसाराम लोमटे यांच्या समग्र साहित्याचा विवेचक अभ्यास' या मराठी विषयात संशोधन कार्य पूर्ण केले आहे.त्याबद्दल त्यांचे डॉ. वैजनाथ अनमूलवाड, डॉ. पी. विठ्ठल, डॉ. दिलीप चव्हाण, डॉ. रमेश ढगे, डॉ. शैलेजा वाडीकर डॉ. राजेंद्र गोणारकर यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले.

# खालेद जाफरखान पठाण यांना पीएच.डी. प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथून खालेद जाफरखान पठाण (कहाळेकर) यांना पीएच.डी. प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी Study of Investment Management in Stock Market by Investors with Special Reference to Use of Fundamental Analysis या विषयावर प्रबंध सादर केला.



त्यांनी हे संशोधनकार्य डॉ. व्ही. ए. पवळे यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. एच. एस. पतंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय, मित्रपरिवार, शिक्षकवर्ग व हितचिंतकांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# पंचशील प्रतिष्ठानच्या चौथा सामूहिक बौद्ध विवाह मेळाव्यात २७ जोडपे परिणयबद्ध



**नांदेड (प्रतिनिधी)**– पंचशील प्रतिष्ठान नांदेडच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी चौथा सामूहिक बौद्ध विवाह मेळावा शहरातील चांदोजी पावडे मंगल कार्यालय येथे भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भारतीय बौद्ध महासभेचे सा. ना. भालेराव आणि सुरेश लोकडे यांच्या हस्ते हजारो जनसमुदायाच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यामध्ये २७ जोडपे परिणयबद्ध झाली.

सामाजिक समता, बंधुता एकतेचा संदेश देत समाजातील गोरगरीब, कष्टकरी, सर्वसामान्य जनतेचा विवाहासाठी होणारा अनाठायी खर्च वाचावा, तोच पैसा समाजाने आपल्या परिवाराचे जीवनमान उंचावण्यासाठी खर्च करावा यातून समाजामध्ये एकी, आपुलकी, प्रेम, सहानुभूती वाढावी या उदात्त हेतूने नांदेड शहरातील पंचशील प्रतिष्ठानच्या वतीने चौथा सामूहिक बौद्ध विवाह मेळावा शहरातील चांदोजी पावडे मंगल कार्यालयात शुक्रवार, दि. ५ जून रोजी दुपारी १२.३० वाजता भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भारतीय बौद्ध महासभेचे सा. ना. भालेराव, सुरेश लोकडे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यामध्ये २७ जोडपे परिणयबद्ध झाली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. या विवाह मेळाव्यासाठी उद्घाटक म्हणून मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, अध्यक्ष म्हणून बीएसएनएलचे उपमहाप्रबंधक आ. बी. मादळे, स्वागताध्यक्ष म्हणून छत्रपती संभाजीनगरचे कार्यकारी अभियंता अशोकराव येरेकर विशेष अतिथी म्हणून प्रफुल्ल सावंत, रमेश सोनाळे, बापूराव गजभारे, मनीष कावळे, पंढरीनाथ बोकारे, इंजि. प्रशांत इंगोले, प्रभू सावंत, आशाताई येरेकर, अनिताताई इंगोले, दादासाहेब शेळके, भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष गणपतराव गायकवाड, हौसाजी वारघडे, इंजि. वसंत वीर, इंजि. अनिलकुमार आठवले, इंजि. यशवंतराव गच्चे, डॉ. दिलीप फुगारे, महेंद्र कावळे, विभागीय पोलीस अधिकारी विजय डोंगरे, एम. डी. थोरात, इंजि. अशोक गायकवाड, पत्रकार संभाजी सोनकांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या विवाह मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी संयोजक सेवानिवृत्त अभियंता भरतकुमार कानिंदे, इंजि. भीमराव धनजकर, सचिव इंजि. आर. बी. मादळे, उपाध्यक्ष भगवानराव धबडगे, सहसचिव यशवंतराव उबारे, कोषाध्यक्ष ॲड.गौतमराव कांबळे, निमंत्रक इंजिनिअर प्रशांत ठमके तसेच कोंडीबा वासाटे, वसंत वीर, विजय रावळे, प्रेमदास घुले, गुणवंत भगत, विजय पोपलवार, टी. पी. वाघमारे, आर. सी. कांबळे,मिसाळे सर, अशोकराव गायकवाड, डी. डी. भालेराव, अनिलकुमार आठवले, रमाबाई पाटील, सुनीता कानिंदे, कुसुम धोटे, जयश्री भगत, निर्मला नरवाडे, दिक्षाताई नांगरे, सुनीता वासाटे, प्रतिमा भगत, पुष्पा भरणे, शैलजा लोणे, विमल किर्तने, मंदा पाटील, जनाबाई पोपलवार आदींनी परिश्रम घेतले.

# अमृत संस्थेमार्फत पर्यटन क्षेत्रातील उद्योजकांसाठी उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रमाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र शासनाच्या अमृत संस्थेमार्फत राबविण्यात येत असलेल्या अमृत पर्यटन उपक्रमांतर्गत पर्यटन क्षेत्राशी संबंधित उद्योजक, व्यावसायिक व नवउद्योजकांसाठी उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी नोंदणी सुरु असून लाभार्थी हा अमृतच्या लक्षित गटाचा असावा अशी महत्वाची सूचना जिल्हा व्यवस्थापक सौरभ संतोष माळहिप्परगेकर यांनी दिली आहे.

अमृत पर्यटन हा महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी, स्थानिक रोजगार निर्मिती वाढविण्यासाठी तसेच पर्यटनाशी संबंधित उद्योजकांना सक्षम करण्यासाठी राबविण्यात येणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. या उपक्रमाद्वारे राज्यातील पर्यटन स्थळे, पर्यटन सेवा, स्थानिक उत्पादने व पर्यटन व्यवसायांना नवीन संधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे.

पर्यटन क्षेत्र हे देशातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या क्षेत्रांपैकी एक असून, या क्षेत्रात व्यवसाय विस्तार, रोजगार निर्मिती व आर्थिक प्रगतीच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. या संधींचा लाभ अधिकाधिक उद्योजकांना मिळावा आणि त्यांना आधुनिक व्यवसाय व्यवस्थापन कौशल्ये प्राप्त व्हावीत, या उद्देशाने या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात टूर्स अँड ट्रॅव्हल्स व्यावसायिक, टुरिस्ट गाईड, कुक आणि केटरर्स, होमस्टे व रिसॉर्ट संचालक, पर्यटन सेवा पुरवठादार, धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाशी संबंधित उद्योजक तसेच पर्यटन क्षेत्रात नवीन व्यवसाय सुरू करू इच्छिणारे युवक-युवती सहभागी होऊ शकतात.

कार्यक्रमादरम्यान सहभागी उद्योजकांना व्यवसाय उभारणी व विस्तारासाठी आवश्यक मार्गदर्शन, प्रभावी व्यवसाय नियोजन, आधुनिक विपणन तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग, ग्राहक व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, ब्रँडिंग, पर्यटन क्षेत्रातील नवीन व्यावसायिक संधी तसेच शासनाच्चे विविध उपक्रम व सहाय्याबाबत सविस्तर माहिती देण्यात येणार आहे.

तसेच अनुभवी तज्ज्ञ व क्षेत्रातील यशस्वी उद्योजकांकडून प्रत्यक्ष अनुभवाधारित मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार असून, सहभागी उद्योजकांना पर्यटन व्यवसाय अधिक प्रभावीपणे विकसित करण्यासाठी आवश्यक दिशा व मार्गदर्शन मिळणार आहे.

# चंदेरी

## आमिर खानचं तिसरे लग्न गौरी स्प्रॅटबरोबर, तारीख जाहीर

बॉलीवूडचा परफेक्शनिस्ट आमिर खानने गेल्यावर्षी ६० व्या वाढदिवसाला त्याच्या गर्लफ्रेंडची ओळख सर्वांना करून दिली होती. गौरी स्प्रॅट असे तिचं नाव. गौरी मुळची बेंगळुरूची आहे. जेव्हा अभिनेत्याने तिची ओळख सर्वांना करून दिली, त्याआधी दीड वर्षांपासून ते रिलेशनशिपमध्ये होते. आता ५ जुलैला ते लग्नबंधनात अडकणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. याबद्दल आमिर खान म्हणाला, की मी सध्या अमेरिकेत आहे. माझ्या लग्नाची जी चर्चा सुरू आहे, ती खरी आहे. माझे लग्न ५ जुलैला आहे. गौरी ही वेलनेस आणि ब्युटी इंडस्ट्रीमध्ये काम करते. १९८६ ला आमिरने रीना दत्ताशी पहिले लग्न केले होते. त्यांना दोन मुले आहेत. २००२ मध्ये त्यांनी घटस्फोट घेतला. आमिर खानने लोकप्रिय चित्रपट निर्माती व दिग्दर्शिका



किरण रावशी दुसरे लग्न केले. २००५ मध्ये त्यांनी लग्नगाठ बांधली होती. त्यांना एक मुलगा आहे. २०२१ मध्ये त्यांनी घटस्फोट घेतला होता.

## रणवीर सिंहचा मोठा निर्णय, कोट्यवधींची फी नाकारली

‘धुरंधर’ आणि ‘धुरंधर २’ या चित्रपटांमुळे रणवीर सिंह प्रचंड चर्चेत आला. त्याच्या दोन्ही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कमाई केली. यातील त्याच्या अभिनयाचं अनेकांनी कौतुक केलं. पण, जगभरात कोट्यवधींची कमाई करत अनेक रेकॉर्ड ब्रेक कमाई करणाऱ्या या चित्रपटासाठी त्याने कमी मानधन घेतलं होतं, असं निर्मात्या ज्योती देशपांडे यांनी सांगितलं आहे. ज्योती देशपांडे यांनी सांगितलं की रणवीर सिंह व दिग्दर्शक आदित्य धर यांनी कमी मानधनाचा करार केला होता आणि चित्रपटाला होणाऱ्या नफ्यातून भागेदारी घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे जर चित्रपटाने रेकॉर्ड ब्रेक कमाई केली नसती तर कदाचित दोघांनाही ठरलेली रक्कमच मिळाली असती.

### रकुल प्रीतची विशेष मुलाखतीत अपेक्षा

## सोशल मीडियावर एकच अकाउंट असावे अन् तेही आधार कार्डशी लिंक!



**प्रतिभावान बॉलिवूड अभिनेत्री रकुल प्रीत आणि तिचा निर्माता-अभिनेता पती जॅकी भगनानी अलीकडेच ट्रोलर्सच्या निशाण्यावर आले. जॅकीने एका मुलाखतीत गंमतीने स्वतःच्या आणि रकुलच्या लग्नाला ‘सिच्युएशनशीप’ म्हटले. त्यानंतर लोकांनी सोशल मीडियावर विविध प्रकारच्या कमेंट्स करायला सुरुवात केली. त्यानंतर रकुलने सोशल मीडियावर एक विनोदी पोस्ट शेअर केली, ज्यामध्ये ती हसत हसत जॅकीला रागावताना दिसत होती, तर जॅकी आपले कान धरून माफी मागताना दिसत होता. रकुल ट्रोलिंगची बळी ठरण्याची ही पहिली वेळ नाही. याआधीही तिला अनेकदा अशाच परिस्थितीचा सामना करावा लागला आहे.**

### तुम्ही प्रत्येकाला खूश करू शकत नाही...

आता इंडस्ट्रीत १६-१७ वर्षे घालवल्यानंतर रकुल ट्रोलिंग आणि टीकेला सामोरे जायला शिकली आहे. सोशल मीडिया ट्रोलिंगबद्दल रकुल म्हणते, ‘माझा विश्वास आहे की आपण कलाकार असो वा सामान्य माणसे, आपल्याला सोशल मीडियाच्या गोंधळातून मार्ग काढायला शिकले पाहिजे. जर आपण तसे केले नाही, तर आपण आपले काम कधीच व्यवस्थित करू शकणार नाही. मला वाटते की एका कलाकाराने आपल्या कामावर लक्ष केंद्रित केले पाहिजे आणि ट्रोलर्सकडे दुर्लक्ष केले पाहिजे. नाहीतर, त्याचा तुमच्या मानसिक स्थितीवर परिणाम होऊ शकतो. सोशल मीडियाचा उपयोग तरी काय? कधीकधी एखाद्याला तुमचा लूक आवडणार नाही किंवा कधीकधी कोणी तुमच्या कपड्यांवर टिप्पणी करेल. कधीकधी एखाद्याला तुमचा चित्रपट आवडणार नाही, त्यामुळे तुम्ही प्रत्येकाला खूश करू शकत नाही. मला आठवतं, जेव्हा मी इंडस्ट्रीत नवीन होते, तेव्हा सोशल मीडियावरील कमेंट्समुळे मला खूप वाईट वाटायचं, पण तेव्हा सोशल मीडिया इतका गोंगाटमय नव्हता. आज प्रत्येकाचं स्वतःचं मत असतं’, असे रकुल म्हणाली.

### सोशल मीडियावर असावे व्हेरिफाईड अकाउंट

रकुल म्हणाली, की अलीकडेच, मी कोणाशीतरी आधारशी जोडलेल्या व्हेरिफाईड अकाउंटच्या महत्त्वाविषयी बोलत होते. जेणेकरून सोशल मीडियावर कोणीही मनमानीपणे वागू शकणार नाही. जर कोणी विधायक टीका केली, तर ते ठीक आहे. पण जेव्हा कोणी तुमच्यावर वैयक्तिकरित्या टिप्पणी करून तुम्हाला दुखावण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा मी त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करायचे ठरवते. सरतेशेवटी, माझा आनंद तिसऱ्या व्यक्तीवर अवलंबून नसावा. माझा विश्वास आहे की प्रत्येकाला आपले मत व्यक्त करण्याचा अधिकार असावा, पण त्याचा वापर एखाद्या स्त्रीच्या प्रतिष्ठेचा अपमान करण्यासाठी निमित्त म्हणून करता येणार नाही. मी ते सहन करत नाही, असे ती म्हणाली.

### सारा अली खानची विशेष मुलाखत

## पतीसाठी चांगल्या पुरुषाच्या शोधात!

**मी कोणाचीही ‘वो’ नाही आणि मला तसे व्हायचेही नाही...**

**अभिनेत्री सारा अली खान स्पष्टवक्ती, मुक्त विचारांची आणि प्रतिभावान आहे. तिने आपल्या कुटुंबाची परंपरा पुढे नेली आहे आणि अभिनयात स्वतःला सिद्ध केले आहे. अनेक भूमिकांसाठी नावाजलेल्या साराला तिच्या शेवटच्या ‘मेट्रो इन दिनों’ या चित्रपटातील कामासाठी खूप प्रशंसा मिळाली. आजकाल ती तिच्या ‘पती, पत्नी और वो दो’ या नवीन चित्रपटामुळे चर्चेत आहे. या विशेष मुलाखतीत तिने तिच्या अध्यात्म, भावी जोडीदार, आई, ट्रोलर्स आणि तिच्या स्पष्टवक्तेपणाबद्दल मनमोकळेपणाने चर्चा केली.**



### स्वत :ला स्वीकारणे हेच खरे अध्यात्म

सारा इंडस्ट्रीतील अशा अभिनेत्रींपैकी एक आहे, जी तिच्या आध्यात्मिक प्रवासासाठीही ओळखली जाते. ती अनेकदा मंदिरे, दर्गे आणि गुरुद्वारांमध्ये रमलेली दिसते. तिच्या आध्यात्मिक प्रवासाबद्दल ती म्हणते, हो, मी आध्यात्मिक आहे, पण त्यासोबतच स्वतःला स्वीकारणेही महत्त्वाचे आहे. तुम्ही ते तुमच्या पालकांद्वारे, तुमच्या वर्कआऊटद्वारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने करा, स्वतःला स्वीकारणे आणि स्वतःला मुक्त ठेवणे आवश्यक आहे. हे माझे वैयक्तिक आयुष्य आहे. मंदिरे, दर्गे आणि गुरुद्वारांना भेट दिल्यानंतर मला बरे वाटते, म्हणूनच मी तिथे पुन्हा पुन्हा जाते. मला पर्वतांमध्ये खूप शांती मिळते. कधीकधी ते पर्वत धार्मिक असतात, पण ते मला नेहमीच आकर्षित करतात, असे सारा म्हणाली.

### ‘मुलीचे मन स्वच्छ आहे...’

एक स्पष्टवक्ता आणि पुढाकार घेणारी अभिनेत्री म्हणून ओळखले जाण्याची साराला पर्वा नाही. तिच्या अत्यंत पारदर्शक असण्यामुळे नेहमीच चर्चा सुरू होते. यावर ती म्हणते, पारदर्शक असण्याचे फायदे आणि तोटे दोन्ही आहेत. जेव्हा तुम्ही मला पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्यांदा भेटता, तेव्हा कदाचित मी तुम्हाला आवडणार नाही. पण जर तुम्ही मला चौथ्यांदा भेटलात, तर आपण मित्र बनू. माझ्या आत एक फिल्टर सिस्टीम आहे, जिथे तुम्हाला मला आवडण्यासाठी चार वेळा भेटावे लागते, कारण पहिल्या तीन वेळा मी तुम्हाला आवडणार नाही. जेव्हा कोणी मला पहिल्यांदा भेटते, तेव्हा त्यांची प्रतिक्रिया असते, हे काय आहे? दुसऱ्यांदा ते म्हणतात, ती खूप विचित्र आहे. तिसऱ्यांदाही त्यांना तितकासा विश्वास बसत नाही. ते म्हणतात, ती काहीही बोलते, पण जेव्हा ते मला चौथ्यांदा भेटतात, तेव्हा ते म्हणतात, तिचं मन स्वच्छ आहे. त्यामुळे जे मला भेटतात, त्यांना या टप्प्यांमधून जावं लागतं. पण हे खरं आहे की लोकांना मी पहिल्या किंवा दुसऱ्यांदा भेटल्यावर आवडत नाही. (हसते)

### ‘वो’ बनायचं नाही...

‘पती पत्नी और वो दो’ मध्ये ‘वो’ व्यक्तिरेखा साकारलेल्या साराचा विश्वास आहे की, ‘वो’ गोष्ट नेहमीच आपल्या आवाक्याबाहेर असते. ती हसून म्हणते, ‘शूटिंगपूर्वी माझे दिग्दर्शक मुदस्सर सरांनी (मुदस्सर अझीझ) मला समजावून सांगितले होते की, जेव्हा आपल्याला एखाद्या निषिद्ध गोष्टीचा उल्लेख करायचा असतो, तेव्हा आपण ‘वो खाना,’ ‘वो जगह’ असे म्हणतो. हे खरं आहे की ‘वो’ शब्द फक्त निषिद्ध गोष्टींसाठीच वापरले जातात. खऱ्या आयुष्यात, मी कोणाचीही ‘वो’ नाही आणि मला तसे व्हायचेही नाही... असं सारा हसून म्हणाली.

### आईसारखी थोडी जरी होऊ शकले, तरी मोठी गोष्ट

आपल्या कारकिर्दीत साराने अनेक चित्रपटांमध्ये पत्नी आणि प्रेयसीच्या भूमिका साकारल्या आहेत. तिला जीवनसाथी म्हणून कोणत्या प्रकारची व्यक्ती आवडेल असे विचारल्यावर, ती हसून म्हणते, मी एका चांगल्या व्यक्तीच्या शोधात आहे. जर तुम्ही खरोखरच चांगली व्यक्ती असाल, तर तुम्ही मला थेट संदेश (DM) पाठवू शकता. माझ्या मते, चांगल्या व्यक्तीची व्याख्या म्हणजे अशी व्यक्ती जी आत्मसंतुष्ट, आत्मविश्वासू आणि आपल्या कामाबद्दल उत्कट असते. हे माझ्यासाठी महत्त्वाचे आहे. इतर गुण असले तरी उत्तमच. पण योग्य वेळ असणे अत्यावश्यक आहे.

### तो नक्कीच कोणीतरी बेरोजगार...

इतर अनेक कलाकारांप्रमाणे, सारा देखील ट्रोलर्सचे लक्ष्य आहे. तिला अनेकदा सोशल मीडियावर टीकेचा सामना करावा लागतो. पण आता, सारा द्वेष करणाऱ्यांना सामोरे जायला शिकली आहे. ती म्हणते, ‘माझाही विश्वास आहे की सोशल मीडियावरील जबाबदारीसाठी वापरकर्त्यांनी त्यांचे आधार कार्ड किंवा इतर कोणतेही अधिकृत कागदपत्रे सादर करावीत, पण दुसरीकडे मला हेही माहीत आहे की हे होणार नाही. त्यामुळे, जेव्हा ते होणार नाही, तेव्हा इतरांपेक्षा स्वतःला नियंत्रित करणे माझ्यासाठी सोपे आहे. हे ऐकायला वाईट वाटेल, पण हा फक्त एक बेरोजगार माणूस आहे जो त्याच्या आयुष्यात नाखुश आहे आणि म्हणूनच तो असा मूर्खपणा बोलत आहे.’

### आईबद्दल बोलताना सारा झाली भावूक...

सर्वांना माहीत आहे की साराच्या आयुष्यात तिच्या आई अमृता सिंग यांचे एक महत्त्वाचे स्थान आहे. आपल्या आईबद्दल बोलताना ती थोडी भावूक होते. तिच्याच शब्दांत, ‘माझा विश्वास आहे की आपण सर्व आपल्या आईमुळेच या जगात आहोत. ती माझी ताकद आहे, माझे जीवन आहे.’

### मी एक असुरक्षित अभिनेत्री नाही...



जेव्हा एखादा अभिनेता मल्टी-स्टारर चित्रपटात काम करतो, तेव्हा नेहमीच हा प्रश्न उपस्थित होतोः त्यांना किती स्क्रीन स्पेस मिळेल? साराला अशी काही असुरक्षितता वाटते का? ती म्हणते, ‘मी या बाबतीत कधीच असुरक्षित नसते. माझं साधं तत्त्व आहे की, तुमचा स्वतःवर आणि तुमच्या दिग्दर्शकावर विश्वास असायला हवा. तुम्ही तुमच्या भूमिकेला न्याय देऊ शकता, असा तुमचा विश्वास असायला हवा. चित्रपटाला फायदा व्हावा यासाठी, प्रत्येकजण आपापलं काम व्यवस्थित करेल याचीही तुम्हाला खात्री करावी लागते. कलाकारांमध्ये ही सुरक्षितता आणि आत्मविश्वास असणं महत्त्वाचं आहे. पती पत्नी और वो दो चित्रपटाआधी, मी मेट्रो... सारख्या मल्टी-स्टारर चित्रपटात काम केलं होतं आणि तेव्हाही मी फक्त माझ्या भूमिकेचाच विचार केला नाही. मला फक्त नायिकेसोबतच चित्रपटात काम करायचं आहे, असा विचार मी कधीच केला नाही. जेव्हा तुम्हाला एका चांगल्या कथेतील एक पात्र बनायचं असतं, तेव्हा स्क्रीन टाइम, सीन्स आणि शॉट्स दुय्यम ठरतात.’, असे सारा म्हणाली.

## प्रत्येक स्त्रीचे शरीर वेगळे असते, रोज सारखेच दिसू याची अपेक्षा करू नका : तापसी पन्नू



**परफेक्ट शरीर मिळवण्याच्या वेडाने मला इतके झपाटले होते, की स्वतःला अत्यंत वेदना सहन करायला लावल्या. मात्र नंतर लक्षात आलं, की शरीरावर मांस असणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत बॉलिवूड अभिनेत्री तापसी पन्नूने व्यक्त केले. आपले शरीर स्वीकारावे आणि सोशल मीडियावर परफेक्ट दिसण्यासाठी स्वतःला त्रास देणे टाळावे, असे आवाहनही तिने आता चाहत्यांना केले आहे.**

तापसी म्हणाली, की पोटाच्या खालच्या भागात नेहमी चरबी का असायची हे मला कधीच कळलं नाही. मी इतका जोरदार व्यायाम करायचे की तो जवळपास प्रमाणापेक्षा जास्त व्हायचा आणि जेव्हा तुम्ही स्वतःवर जास्त ताण देता, तेव्हा तुमच्या मेंदूत एक धोक्याची सूचना येते की तुमच्या शरीराला स्वतःचे संरक्षण करण्याची गरज आहे. शरीरातील पाणी कमी करण्याऐवजी, शरीर ते साठवू लागते आणि मग पोटाच्या खालच्या भागातील चरबी, जी केवळ चरबी नसून साठलेले पाणीदेखील असू शकते, तशीच राहते. अति व्यायामामुळे ती वाढते, जे माझ्या मते लोकांनी नक्कीच टाळले पाहिजे, असे तापसी म्हणाली. प्रत्येक स्त्रीचे शरीर वेगळे असते आणि त्यांनी दररोज आपले पोट सारखेच दिसेल अशी अपेक्षा करू नये. कारण महिलांच्या शरीरात अनेक हार्मोनल बदल होत असतात. ती म्हणाली, की ते इतर कोणत्याही मुलीसारखे दिसू शकत नाही. त्यामुळे तुम्हाला ते स्वीकारावे लागेल. मी ते खूप उशिरा स्वीकारले. खूप आत्मपरीक्षण केल्यानंतर माझ्या लक्षात आले की काही दिवस ते असे असते आणि काही दिवस नसते. माझ्या आहारतज्ज्ञ, मुनमुन गनेरीवाल यांनी मला समजावून सांगितले की पोटाखाली थोडी चरबी आणि थोडे पाणी असणे महत्त्वाचे आहे. कारण तिथेच तुमचे प्रजनन अवयव असतात आणि त्यांना संरक्षणाची गरज असते. हे तुमच्या आरोग्यासाठी चांगले आहे. म्हणून, फक्त त्या परफेक्ट इंस्टाग्राम फोटोंसाठी स्वतःला दोष देऊ नका. शरीरावर थोडासा फुगवटा आणि चरबी असणे आरोग्यासाठी चांगले मानले जाते. कृपया स्वतःला दोष देऊ नका, असे आवाहन तिने चाहत्यांना केले.

### ‘अस्सी’ बॉक्स ऑफिसवर अपयशी

तापसी अलीकडेच ‘अस्सी’ या चित्रपटात दिसली होती. अनुभव सिन्हा दिग्दर्शित हा चित्रपट एक कोर्टरूम ड्रामा होता. चित्रपटाला समीक्षकांची प्रशंसा मिळाली, परंतु तो बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरला. जगभरात केवळ १४ कोटी ९४ लाख रुपये कमाई करून त्याचा प्रवास संपला. ती आता नेटफ्लिक्सच्या ‘गांधारी’ या चित्रपटात दिसणार आहे. हा चित्रपट अपहरण झालेल्या मुलाला शोधण्यासाठी एका आईच्या अथक संघर्षाची कथा सांगतो. हा चित्रपट या वर्षी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होण्याची शक्यता आहे.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# शिवरायांच्या विचारांचा आदर्श घेऊन कर्मचाऱ्यांनी कर्तव्याप्रती कटिबद्ध राहावे -जिल्हाधिकारी



**नांदेड (प्रतिनिधी)** –छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त जिल्हा परिषदेत शनिवार, दि. ६ जून रोजी सकाळी शिवस्वराज्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी शिवरायांच्या लोककल्याणकारी, न्यायप्रिय आणि जनहितवादी प्रशासन व्यवस्थेचा आदर्श घेऊन शासनाच्या विविध विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कटिबद्ध राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच गुढीपूजन व गुढी उभारणी करून शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात आला. श्री चैतन्य इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

यावेळी राहुल कर्डिले म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी आदर्श प्रशासन उभे केले. शेतकऱ्यांना मदत, सिंचन व्यवस्थेचा विकास, न्याय्य कारभार आणि दूरदृष्टीपूर्ण नियोजन यामुळे त्यांचे राज्य लोकाभिमुख ठरले. प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याने आपल्या कामातून शिवरायांच्या प्रशासनाची मूल्ये जपली पाहिजेत, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमात शाहीर रमेश गिरी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पोवाडे व शाहिरी सादर करून उपस्थितांना शिवचरित्राची प्रेरणादायी आठवण करून दिली. उपस्थित मान्यवरांचा शाल, पुस्तक आणि जिल्हा परिषदेचा लोगो असलेला स्मृतिचिन्ह कप देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय तुबाकले यांनी केले. सूत्रसंचालन पद्माकर कुळकर्णी व मिलिंद व्यवहारे यांनी केले, तर आभार उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांनी मानले. यावेळी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ. एस. बी. खुणे, सहायक आयुक्त डॉ. प्रवीणकुमार घुले, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कर्तव्यात प्रामाणिकपणा हीच शिवरायांना आदरांजली -शहाजी उमाप

अनेक संकटांचा सामना करत छत्रपती शिवाजी महाराजांनी लोककल्याणकारी आणि न्यायाधिष्ठित राज्य उभे केले. आपल्या प्रजेवर कोणताही अन्याय होऊ नये यासाठी ते सदैव जागरूक राहिले. शासनाच्या माध्यमातून आपल्या वाट्याला आलेले कार्य प्रामाणिकपणे व जबाबदारीने पार पाडणे हीच शिवरायांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले.

### शिवरायांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन जनतेची सेवा करावी -मेघना कावली

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याची संकल्पना ही लोककल्याण, न्याय, पारदर्शक प्रशासन, स्त्री सन्मान, पर्यावरण संवर्धन या मूल्यांवर आधारित होती, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी केले. आजच्या प्रशासन व्यवस्थेतही या मूल्यांचे महत्त्व कायम असून प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने शिवरायांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन जनतेच्या सेवेसाठी समर्पित भावनेने कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# महावितरणचा २१ वा वर्धापन दिन साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या नांदेड परिमंडल कार्यालयात २१ वा वर्धापन दिन अत्यंत साधेपणाने पण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेशचंद्र यांनी वीज ग्राहक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक करुन विजेच्या बाबतीत राज्याला स्वयंपूर्णतेकडे नेत अधिकाधिक चांगल्या ग्राहक सेवा देण्यासाठी येणाऱ्या आव्हानांचा सामना करण्याबरोबरच काही नवसंकल्प घालून दिले.



नांदेड येथील महावितरणच्या परिमंडल कार्यालयात शनिवार, दि. ६ जून रोजी झालेल्या समारंभात मुख्य अभियंता राजाराम माने, अधीक्षक अभियंता संजय खंदारे, सहायक महाव्यवस्थापक प्रदीप सातपुते यांच्यासह सर्व कार्यकारी अभियंते, अतिरिक्त व उपकार्यकारी अभियंते, इतर विभागाचे सर्व अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यालय स्तरावरून ऑनलाईन माध्यमातून प्रसारित करण्यात आलेल्या दूरदृष्य चित्रफितीद्वारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणच्या लोकाभिमुख विकास कामाचे कौतुक करून महावितरण अधिकारी कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेशचंद्र यांनी महावितरणच्या गौरवपूर्ण कार्याचा इतिहास सांगून २०३० पर्यंत सौर आणि इतर अपारंपरिक ऊर्जेच्या माध्यमातून राज्याला विजेच्या बाबतीत स्वयंपूर्णतेकडे नेण्यासाठी नवसंकल्प घालून दिले. उपस्थित सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीही अध्यक्षांनी घालून दिलेल्या संकल्पाचे टाळ्या वाजवून स्वागत केले. मुख्यालयातून प्रसारित झालेल्या कार्यक्रमास संचालक सचिन तालेवार, संचालक राजेंद्र पवार, संचालक अनुप दिघे, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, संचालक योगेश गडकरी, कार्यकारी संचालक धनजंय औंढेकर उपस्थित होते.

नांदेड येथे झालेल्या कार्यक्रमातही कर्मचाऱ्यांना विद्युत सुरक्षेची शपथ देण्यात येऊन नवसंकल्प पत्रिकेचे वाचन करण्यात आले. मुख्य अभियंता राजाराम माने यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात वीज कर्मचाऱ्यांनी शून्य वीज अपघात संकल्पना राबविण्यासाठी सुरक्षा साधनांचा कटाक्षाने वापर करण्याचे आवाहन केले तर अधीक्षक अभियंता संजय खंदारे यांनी कर्तव्य भावनेतून ग्राहक सेवा बजावण्यासाठी कर्मचाऱ्यांना सदैव दक्ष राहण्याचे आवाहन केले. नांदेड शहरातील विद्युत रोहित्रांच्या पेट्या दारबंद करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

# डीआयजी पथकाची मटका व जुगार अड्ड्यांवर धाड; ५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** – परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी लातूर जिल्ह्यात पोलीस पथकाची रवानगी केली होती. या पथकाने दि. ५ जून रोजी लातूर जिल्ह्यातील निलंगा शहरातील शिवाजी चौक परिसरात चालू असलेल्या दोन मटका बुकींवर कारवाई केली. या कारवाईत २४ हजार ३२० रुपयांची रोकड, ४३ हजार रुपयांचे (६) मोबाईल व ४८ हजार ६०० रुपयांचे संगणक साहित्य असा एकूण १ लाख १५ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणात एकूण ६ आरोपीतांना ताब्यात घेऊन, त्यांचेविरुध्द निलंगा पोलीस ठाणे येथे गुरनं २३२/२०२६ व २३३/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.


तद्नंतर मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून शिरुर अनंतपाळ येथे हॉटेल युवराज बारचे समोरील नटू लंच होम येथे छापा टाकला असता या ठिकाणी तिर्रट नावाचा जुगार खेळताना ९ इसम मिळून आले. सदर इसमांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून २८ हजार ३०० रुपयांची रोकड, ६१ हजार रुपयांचे ८ मोबाईल, व ३ लाख



रुपयांच्या ६ मोटारसायकली असा एकूण ३ लाख ८९ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यांचेविरुध्द शिरुर अनंतपाळ पोलीस ठाणे येथे गुरनं १०२/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. उपरोक्त तिन्ही कारवायांत, पोलीस पथकाने एकूण ५ लाख ५ हजार २२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपीतांविरुद्ध वरीलप्रमाणे गुन्हे नोंद केले आहेत.

# मास रेड अंतर्गत सात लाख १६ हजारांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– ऑपरेशन क्रॅकडाउन अंतर्गत जिल्ह्यातील अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणारे, जुगार खेळणारे व गोवंश वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध मास रेडचे आयोजन करण्यात आले होते. या कारवाईमध्ये ७ लाख १६ हजार ५७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



नांदेड जिल्ह्यातील अवैध व्यवसाय पूर्णतः बंद करण्या-संबंधाने ऑपरेशन क्रॅकडाउन अंतर्गत अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणारे, जुगार खेळणारे व गोवंश वाहतूक करणारे इसमांविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिनांक ५ जून रोजी मास रेडचे आयोजन केले होते. अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, सुरज गुरव यांच्यासह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी भाग घेतला होता.

या मास रेड दरम्यान अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणारे, जुगार खेळणारे व गोवंश वाहतूक करणारे ठिकाणांवर छापा टाकून समूळ उच्चाटन करण्यासाठी राबविलेल्या मोहिमेमध्ये नांदेड जिल्ह्यात एकूण ६२ गुन्हे दाखल करून एकूण ६३ आरोपीतांवर कारवाई करत एकूण ७ लाख १६ हजार ७५० रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# पद्मीनबाई सिरसाट यांचे निधन

**मारतळा (प्रतिनिधी)** – लोहा तालुक्यातील उमरा येथील पद्मीनबाई रावसाहेब पाटील सिरसाट (वय ८० वर्षे) यांचे दि. ६ जून रोजी दुपारी ३:३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवार, दि. ७ जून रोजी सकाळी १० वाजता उमरा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, पाच मुली, जावई, नाती, नातू असा परिवार आहे. त्या तिरुपती रावसाहेब पाटील सिरसाट यांच्या मातोश्री तर गोविंद बाबाराव पाटील सिरसाट, बालाजी पाटील सिरसाट यांच्या त्या काकू होत.



# हडको येथे शिवराज्याभिषेक सोहळा दिन साजरा

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा दिन ६ जून रोजी हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिषेक व पुष्पहार अर्पण करून ढोलताशांच्या गजरात, फटाक्यांची आतीषबाजी व जयघोष करीत साजरा केला. यावेळी लोकप्रतिनिधी, सर्व पक्षीय पदाधिकारी, विविध प्रतिष्ठानचे व्यापारी, डॉक्टर, पत्रकार यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी मिठाईचे वाटप करण्यात आले तर शिवंशराजे ताटे यांच्या हस्ते महाभिषेक पूजन करण्यात आले. शिवराज्याभिषेक सोहळा दिनानिमित्त ६ जून रोजी हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे सकाळी १० वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनिधी राजू लांडगे, सतिश बसवदे, माजी नगरसेवक संजय इंगेवाड, देविदास बसवदे, जीवनराव शिंदे, डॉ. अशोक कलंत्री, डॉ. नरेश रायेवार, डॉ. विजयानंद भोग, डॉ. अशोक भिसे, साहेबराव गाढे, भगवानराव ताटे, टी. एम. मोरे, जयवंतराव काळे, प्रशांत कदम, सुभाष सूर्यवंशी, गोविंद जाधव, शंकर पाटील घोरबांड, गोविंद मजरे, संतोष मुळे, महेश घोगरे, नामदेव पवळे, आनंदराव गायकवाड, संदीप कदम, डॉ. राहुल वाघमारे, गजानन शिंदे, विनोद कांचनगिरे, सुदर्शन कांचनगिरे, एस. टी. मोरे, भुजंग मोरे, पिंटू महाराज, धिरज स्वामी, प्रमोद मैड, जितेश कोटलवार, पोलीस अमलदार मारोती माने यांच्यासह राजकीय, सामाजिक व विविध संघटना, पत्रकार यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन डी. गा. पाटील यांनी केले.



# मुरारीलाल शर्मा स्मृतीप्रीत्यर्थ मोफत दमा औषधोपचार शिबीर

**नांदेड (प्रतिनिधी)** – प्रा. मुरारीलाल शर्मा यांच्या स्मृतिदिनानिमित्त रविवार, दि. ७ जून रोजी इतवारा परिसरातील डॉ. दिलीपकुमार शिवाल यांच्या रुग्णालयात सकाळी १०:३० ते दुपारी २ या वेळात हैदराबाद येथील आयुर्वेदाचार्य डॉ. सुरेंद्र शर्मा यांनी तयार केलेल्या दम्याच्या आयुर्वेदिक औषधीचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. गरजू रुग्णांनी या औषध वाटप शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेने केले आहे.

# सततच्या पाठपुराव्यामुळे अनेक कामे मार्गी; उर्वरित कामे लवकरच पूर्ण करू -महापौर कविता मुळे

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)** –नांदेड मनपावर पहिल्यांदाच भाजपची सत्ता आणि पहिल्या महापौर म्हणून शिक्षिका असलेल्या कविता मुळे यांची वर्णी लागली. माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये एका कार्यक्रमात शंभर दिवसांचा आराखडा तयार करून विविध विकासकामे हाती घेण्यात आली. ही कामे झपाट्याने पूर्णत्वास गेली आणि उर्वरित कामे लवकरच मार्गी लागतील असा विश्वास महापौर कविता मुळे यांनी 'गोदातीर समाचार'शी बोलताना व्यक्त केला. येणाऱ्या काळात घरकुलांच्याही कामांना गती देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नांदेड - वाघाळा शहर महानगर-पालिकेच्या महापौर म्हणून मी पदभार स्वीकारल्यानंतर मागील पाच वर्षाहून अधिक काळ प्रशासकराजमध्ये लोटलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना कामाची आवड निर्माण करत त्यांना मुख्य प्रवाहात आणले. त्यानंतर खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत शंभर दिवसांचा विकास कामांचा आराखडा तयार केला आणि त्यानुसार विकास कामांची गती वाढविण्यासाठी स्वतः पुढाकार घेतला. यासाठी आपल्या प्रत्येक प्रभागातील नगरसेवकांनाही विश्वासात घेऊन त्या त्या भागातील महत्त्वाची कामे हाती घेतली. विशेष म्हणजे पावसाळापूर्व जी महत्त्वाची कामे होती त्या कामांना गती दिली. मोठ्या प्रमाणात विकास आराखड्यामध्ये सांगितलेल्या कामांपैकी महत्त्वाची व मुख्य कामे मार्गी लागली आहेत. उर्वरित कामे लवकरच मार्गी लागतील. त्यासाठी विधान परिषद निवडणूक संपल्यानंतर आढावा घेण्यात येईल, असेही कविता मुळे यांनी सांगितले.

गोदावरी नदी प्रदूषणमुक्त करण्याकरिता गोदावरी नदीस वाहून येणाऱ्या एकूण १७ नाल्यांपैकी १४ नाल्यांचे पाणी अडवून १२०० मि. मी. व्यासाच्या आरसीसी पाईप लाईनव्दारे NRP मलउपसा केंद्राकडे वळवून बोंढार मलशुध्दीकरण प्रकल्प येथे शुद्धीकरण करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे NRP लाईन पूर्ण करण्याचे नियोजन असून, गोदावरी नदीच्या पाण्याचे शहरातील घाण पाण्याच्या नाल्यामुळे होणारे प्रदूषण रोखण्यास मदत होईल. बंदाघाट व गोवर्धनघाट येथील नाल्याचे पाणी आडवून बंदाघाट येथे २.५ MLD Pocket STP d SPS उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.



या ठिकाणी संपवेलसाठी कंत्राटदारांकडून १० HP पंप मागविण्यात येत आहेत. तसेच Pocket STP फॅब्रिकेशनचे काम ५०% पूर्ण झाले असून उर्वरित काम ५ दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे.

गोदावरी नदीत वाहून येणाऱ्या दक्षिणेकडील एकूण ५ नाल्यांचे पाणी आडवून ३०० मि.मी. ते ९०० मि. मी. व्यासाच्या आरसीसी पाईपलाईनव्दारे मलउपसा केंद्र (वसरणी) येथे वळवून इलिचपूर येथील मलशुध्दीकरण केंद्र येथे शुध्दीकरण करण्याचे काम ५० मी. शिल्लक आहे. उर्वरित काम पुढील १० दिवसांत पूर्ण होणार असेही त्या म्हणाल्या.

नांदेड शहराचे घाण पाणी शुद्ध करण्यासाठी अस्तित्वातील बोंढार STP व सांगवी STP येथील जुन्या मशिनरी नादुरुस्त झाल्याने घाण पाण्यावर प्रक्रिया होण्याची गती मंदावली असल्याने नादुरुस्त झालेल्या मशिनरी बदलून नवीन मशिनरी जसे की, ऐरीऐटर, मेकॅनिकल स्क्रीन, क्लोरीनेशन युनिट, फ्लोटींग ऐरीऐटर, इलेक्ट्रीक पॅनल युनिट बदलण्याचे नियोजन आहे. त्यामुळे नांदेड शहरामधील घाण पाण्यावरील प्रक्रियेमध्ये सुधारणा होऊन शुध्द पाणी पुनर्वापर करता येईल व येथील शेतकऱ्यांना शेतीसाठी विक्री करुन मनपास आर्थिक मदत होऊ शकेल. सदर काम जल ही अमृत या योजनेतून करण्याचे नियोजित असून सदर कामाचा प्रस्ताव स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यात आला आहे. स्थायी समितीची मान्यता झाली असून विधान परिषदेची आचारसंहिता असल्यामुळे आचारसंहित संपल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

कोटीतीर्थ ते डंकीन raw water rising main 750 mm व्यासाची प्रास्तावित असून त्याची एकूण लांबी ६३०० मीटर एवढी आहे. सदरील काम ९८% पूर्ण झाले असून, या महिन्यात अखेर कोटीतीर्थ पंप हाऊसमध्ये डंकीणसाठी ३७५ HP चे ३ पंप बसवून स्वतंत्रपणे पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. त्यामुळे काबरानगर जलशुद्धीकरण केंद्रास आवश्यक प्रमाणात विनाअडथळा पाणी पुरवठा करणे शक्य होणार आहे. उन्हाळ्याच्या दिवसात व जूनच्या सुरवातीला वादळ-वाऱ्यापासून पम्पिंग स्टेशनला पुरवठा करणारे विद्युत तार व खांबे तुटून विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे अनेक वेळा शहराचा पाणी पुरवठा बंद राहतो व या पुढील काळात बंद राहू नये म्हणून १) NTC मील सबस्टेशन ते डंकीन जलशुध्दीकरणक केंद्रापर्यंत ३.४ किमी. - काम पूर्ण, वाघाळा सबस्टेशन ते असदवन जलशुध्दीकरण केंदापर्यंत ०८ किमी. पैकी १०० मी. काम शिल्लक आहे. असर्जन सबस्टेशन ते काळेश्वर पंप हाऊसपर्यंत १.५ कि.मी. पैकी १०० मी. शिल्लक Underground Express feeder cable टाकण्याचे काम ५ दिवसांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

२४ तास पाणीपुरवठा करणेचे काम प्रायोगिक तत्वावर रविनगर कौठा येथे १४०० नळधारकांना देण्यात येत आहे. या सोबतच वजिराबाद चौकात वाहतुकीवर नियंत्रण करणारे कॅमेरे सिग्नल लावण्यात आले. तसेच आरटीई अंतर्गत महानगरपालिकेच्या ७४ सेवा ऑनलाइन करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. पाऊस पडताच वृक्षारोपणही मोठ्या प्रमाणात करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.







**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com